
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २९९
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, १७ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

अलिबाग-धरमतर व मांडवा मार्गावर अवजड वाहनांना बंदी/२
श्रीवर्धनमध्ये ढगाळ वातावरण व प्रचंड उष्मा/५
'तांबडी निकालाविरोधात हायकोर्टात जाण्याची तयारी'/७

## बंगालच्या उपसागरात शक्ती चक्रीवादळाची शक्यता



**नवी दिल्ली** : भारतीय हवामान विभागाने अंदमान समुद्रावरील हवामानात चक्रीय वाऱ्याचे क्षेत्र निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. १६ ते २२मे दरम्यान हे क्षेत्र कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. पुढे बंगालच्या उपसागरात हे हवामान क्षेत्र विकसित होऊन २३ ते २८ मेदरम्यान शक्ती चक्रीवादळामध्ये रूपांतरित होऊ शकते, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे, ज्याचा संभाव्य फटका भारतातील ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारी भागांना तसेच बांगलादेशमधील खुलना व चटग्राम या भागांना बसू शकतो. दरम्यान, नैऋत्य मान्सूनने १३ मेपासून दक्षिण बंगालचा उपसागर, दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटे आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागांमध्ये प्रवेश केला आहे. एक आठवडा आधीच मान्सून अंदमानात दाखल झाल्याने मागील सात वर्षांतील हा सर्वात लवकर दाखल झालेला मान्सून आहे.

# ...हा फक्त ट्रेलर, योग्य वेळी पूर्ण चित्रपट दाखवू!

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचा पाकिस्तानला इशारा





**भुज (गुजरात) : वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूरनंतर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह शुक्रवारी (दि. १६) गुजरामधील भुज एअरबेसवर पोहचले. या वेळी त्यांनी जवानांची भेट घेत त्यांचे भरभरून कौतुक केले. त्याचबरोबर पाकिस्तानला इशारा देताना, ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही. हा फक्त ट्रेलर आहे. योग्य वेळ आल्यावर जगाला पूर्ण चित्रपट दाखवू, असे म्हटले.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले, आपल्या हवाई दलाची पोहच पाकिस्तानच्या प्रत्येक कोपऱ्यापर्यंत आहे. हे आता पूर्णपणे सिद्ध झाले आहे. आज परिस्थिती अशी आहे की, भारताची लढाऊ विमाने हे सीमा ओलांडल्याशिवाय येथून देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात मारा करण्यास सक्षम आहेत. संपूर्ण जगाने पाहिले, तुम्ही पाकिस्तानी भूमीवरील नऊ दहशतवादी अड्डे कसे उद्ध्वस्त केले.

ऑपरेशन सिंदूरदरम्यान तुम्ही जे काही केले. त्यामुळे सर्व भारतीयांना अभिमान वाटला आहे; मग ते भारतात असोत किंवा परदेशात. पाकिस्तानमध्ये वाढणाऱ्या दहशतवादाला चिरडून टाकण्यासाठी भारतीय हवाई दलाला फक्त २३ मिनिटे पुरेशी होती. लोकांना नाश्ता करायला जितका वेळ लागतो, तितक्या वेळात तुम्ही तुमच्या शत्रूंना संपवले. एक प्रसिद्ध म्हण आहे दिवसा तारे दिसणे. ब्राह्मोसने पाकिस्तानला रात्रीच्या अंधारात दिवसाचा प्रकाश दाखवला, अशा शब्दांत राजनाथ सिंह यांनी जवानांचे कौतुक करीत त्यांचे मनोधैर्य वाढवले.

पहलगाममध्ये त्यांनी धर्म विचारून मारले आणि आम्ही दहशतवाद्यांना, पाकिस्तानला त्यांचे कर्म पाहून अद्दल घडवली. मी जगाला विचारू इच्छितो की, अशा बेजबाबदार आणि दुष्ट राष्ट्राच्या हातात अण्वस्त्र सुरक्षित आहेत का? आता दहशतवादाविरुद्धची लढाई केवळ सुरक्षेचा मुद्दा राहिलेला नाही, तर राष्ट्रीय संरक्षणाचा एक भाग बनला आहे. आपण तो मुळापासून उखडून टाकू. आता भारत पूर्वीसारखा राहिलेला नाही. एका नवीन भारताचा जन्म झाला आहे. पाकिस्तानला भारताने प्रोबेशन पिरियडवर ठेवले आहे. त्यांनी पुढील काळात आपली वर्तणूक सुधारली तर ठीक आहे. नाहीतर त्यांना पुन्हा धडा शिकवला जाईल, असेही संरक्षणमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.

## बालवाङ्मय वाचण्याचे माझे वय राहिलेले नाही

### संजय राऊत यांच्या पुस्तकावर मुख्यमंत्र्यांचा टोला



**बुलढाणा : प्रतिनिधी**

कथा-कादंबऱ्या वाचणे आम्ही केव्हाच सोडले आहे. आता माझे बालवाङ्मय वाचण्याचे वयही राहिलेले नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांना टोला लगावला.

भाजपच्या बुलडाणा जिल्हा कार्यालयाच्या भूमिपूजन सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री शहरात आले होते. त्या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

'नरकातला स्वर्ग' या संजय राऊत लिखित पुस्तकात अनेक दावे करण्यात आले असून आम्ही अजून काही लिहिले असते, तर धमाका झाला असता, असे त्यांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशा गोष्टींवर फार गांभीर्याने विचार करण्याची गरज नाही. ते कोण आहेत? मोठे नेते आहेत का? असा सवाल करीत राऊतांना डिवचले.

## वानखेडे स्टेडियमवर स्टॅण्ड नामकरण सोहळा; मान्यवरांची उपस्थिती



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर भारतीय संघाचा क्रिकेटपटू रोहित शर्मा, माजी कर्णधार अजित वाडेकर, आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांच्या नावाने स्टॅण्ड तसेच एमसीएचे माजी अध्यक्ष स्व. अमोल काळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एमसीएच्या ऑफिस लाउंजचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १६) करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमसीएने प्रस्ताव दिल्यास एक लाख प्रेक्षक बसू शकतील, अशा क्षमतेचे भव्य क्रिकेट स्टेडियम राज्यात बांधू, अशी घोषणा केली.

लॉर्ड्स ही क्रिकेटची पंढरी असल्याचे पूर्वी म्हटले जायचे, पण क्रिकेटची खरी पंढरी वानखेडे स्टेडियम आहे. पंढरी तिथे देव व क्रिकेटचा देव म्हणजे सचिन तेंडुलकर. त्याचा पुतळा वानखेडे स्टेडियमध्ये आहे. क्रिकेटच्या पंढरीत आज जो सोहळा होत आहे, तो अतिशय महत्त्वाचा आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वानखेडे स्टेडियमला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. पुढचे ५० वर्ष वानखेडे हे आयकॉनिक स्टेडियम म्हणून गणले जाईल, पण मागच्या काळात अमोल काळे आणि एमसीएच्या पदाधिकाऱ्यांनी एक लाख प्रेक्षक बसू शकतील, असे स्टेडियम उभारण्याबद्दल चर्चा केली होती. मी आजच याठिकाणी सांगतो की, एमसीएने प्रस्ताव दिल्यास महाराष्ट्र सरकारच्या वतीने उचित जागा तुम्हाला दिली जाईल. किमान एक लाख लोक बसू शकतील असे स्टेडियम उभारू.चार वर्षांनी एमसीएला १०० वर्ष पूर्ण होत आहेत. शताब्दीच्या निमित्ताने हे स्टेडियम पूर्ण होईल, असा प्रयत्न एमसीएने करावा, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरद पवार, क्रिकेटपटू, एमसीएचे पदाधिकारी, रोहितचे आई-वडील, पत्नी आदी उपस्थित होते.



**पनवेल : प्रणव भरत पाटील (रा. बेलवली) या सेंट झेवियर्स इंग्लिश हायस्कूल कोन येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्याने दिव्यांगात्वर मात करीत इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८६.८०% गुण मिळवले आहेत. प्रणवला डीएमडी हा स्नायूंचा अतिदुर्धर आजार आहे. तरीही त्याने अभ्यासात कोणतीही कसर न ठेवता जिद्ध व आत्मविश्वासाने पेपर देत सुयश प्राप्त केले. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रणवचे अभिनंदन केले व शाबासकीची थाप देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : येथील महानगरपालिकेची मान्सूनपूर्व कामे सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर शहरातील नालेसफाई, प्रगतिपथावर असलेली विविध विकासकामे, होल्डिंग पॉईंट तसेच पंपिंग स्टेशन व इतर ठिकाणांची महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, डॉ. सुरेखा मोहोकर, प्रिती जॉर्ज-म्हात्रे, सारिका भगत, मुख्य अभियंता संजय कटेकर व अन्य अधिकारी सहभागी झाले होते. या वेळी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना करण्यात आल्या.**

## खेलो इंडिया युवा स्पर्धेत महाराष्ट्राची विजेतेपदाची हॅट्ट्रिक

KHELO INDIA WINTER GAMES 2025

**मुंबई : प्रतिनिधी**

बिहार येथे झालेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने सलग तिसऱ्या वर्षी देशात प्रथम क्रमांक पटकावून अभूतपूर्व विजय मिळविला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ५८ सुवर्ण, ४७ रौप्य व ५३ कांस्य अशी एकूण १५८ पदके मिळवून सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्ट्रिक साधली.

या ऐतिहासिक यशाचे मानकरी असलेल्या विजेत्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी अभिनंदन केले.

'भले शाब्बास!, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आपण सर्वांनी महाराष्ट्राच्या क्रीडा गौरवात आणखी भरच घातली आहे. या यशामुळे आपण सर्व खेळाडू महाराष्ट्राचा अभिमान आहात,' अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विजेत्या चमुतील खेळाडूंचे अभिनंदन केले.

ग्रामीण भागांतून येणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठीची प्रेरणा मिळावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून खेलो इंडिया स्पर्धा २०१८पासून सुरू झाली. या स्पर्धेत आतापर्यंत महाराष्ट्राने पाचव्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरणे ही बाब आपल्या ग्रामीण भागातील खेळाडूंच्या गुणवत्तेची चुणूक दाखवणारी आहे. या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक आणि खेळाडूंच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिलेल्या त्यांच्या कुटुंबियांचेदेखील कौतुक करावे तितके थोडेच आहे, अशा भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केल्या तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

क्रीडामंत्री भरणे यांनी, ही कामगिरी म्हणजे खेळाडूंची मेहनत, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, संघटनांचे योगदान आणि पालकांचे प्रोत्साहन यांचे फलित आहे. मी सर्व खेळाडूंना, प्रशिक्षकांना आणि पालकांना शुभेच्छा देतो, असे त्यांनी संदेशात म्हटले आहे.

## भाजप पनवेल शहर मंडळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मान्यतेने पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

यामध्ये सरचिटणीसपदी अमित मनोहर ओझे, रूपेश रमेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रभाकर राजाराम बहिरा, प्रितम धनाजी म्हात्रे, केदार सुरेश भगत, चिटणीस सपना वासुदेव पाटील, संजिवनी खिल्लारे, महेश मोहन राऊळ, प्रशांत अरुण शेटे व कोषाध्यक्षपदी प्रवीण रंगराव मोरबाळे; त्याचबरोबर महिला मोर्चा अध्यक्षपदी रूचिता लोंढे-समेळ, ओबीसी मोर्चा अध्यक्ष सतिश दत्तात्रेय पाटील, किसान मोर्चा अध्यक्ष रूपेश पांडुरंग परदेशी, कामगार आघाडी विनायक नकुल मुंबईकर, आध्यात्मिक समन्वय प्रकोष्ठ संदीप (गुरूनाथ) जनार्दन लोंढे, सहकार सेल महेंद्र श्रीनिवास गोडबोले, सोशल मीडिया सेल प्रसाद एकनाथ हनुमंते, आयटी सेल अमेय मोहन देशमुख, भटके विमुक्त आघाडी चंद्रकांत शंकर मंजुळे, सांस्कृतिक सेल वैभव किशोर बुवा, व्यापार आघाडी संजय मोतीलाल जैन, शिक्षक सेल हिरा तुकाराम कोळी, मच्छीमार सेल हरिश्चंद्र भगत आणि दिव्यांग सेलची जबाबदारी राजा चव्हाण यांच्याकडे देण्यात आली आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.



# सौरऊर्जेच्या माध्यमातून दिवसा वीज उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न -उपमुख्यमंत्री

**बारामती : प्रतिनिधी**

राज्यात पीएम-सूर्य घर : मोफत वीज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करुन सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिमिर्तीवर भर देण्यात येत आहे, आगामी काळात नागरिकांच्या वीज देयकात बचत करण्याच्यादृष्टीने दिवसा वीज उपलब्ध करुन देण्यास राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.



मुढाळे येथे महापारेषणच्या २२०/३३ के.व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापारेषणचे मुख्य अभियंता अनिल कोळप, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता संदीप हाके, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता राजकुमार जाधव, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. केशवराव जगताप आदी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, ग्रामीण भागातील उद्योजक, शेतकरी आणि घरगुती वापराकरिता लागणारी वीज तसेच राज्यातील वाढते औद्योगिकरण लक्षात घेता सर्व घटकांना योग्य दाबाने वीजपुरवठा झाला पाहिजे याकरीता शासनाच्यावतीने वीजेचे उपकेंद्र उभारण्यात येत आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी याकरीता याकरीता सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. शेतात सौर कृषी पंप देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या कृषी पंपाना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला असून सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ घेतला आहे.

पीएम-सूर्य घर : मोफत वीज योजनेअंतर्गत १ लाख ३० हजार घरांच्याकरीता ५०० मेगॉवटपेक्षा अधिक क्षमतेचे छतावर सौरसंच बसविण्यात आले आहेत तसेच या योजनेअंतर्गत १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक अनुदान लाभार्थ्यांना दिले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलांनाही सोलरच्या माध्यमातून वीज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या (एआय) वापरासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासर्व प्रयत्नामुळे वीजेच्या देयकात बचत होण्यास मदत होईल.

## कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात 'महानिर्मिती' राज्यात दुसरी

**कल्याण : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या राज्य शासनाच्या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम अंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड (महानिर्मिती) ने उल्लेखनीय यश मिळवत राज्यातील सहभागी एकूण ९५ आस्थापनांमध्ये दुसरा क्रमांक पटकावला आहे.

या कार्यक्रमात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवा विषयक गुणवत्तेचे निकष गृहीत धरून क्वालिटी काउंसिल ऑफ इंडियाकडून मूल्यांकन करण्यात आले. महानिर्मितीने या सर्व निकषांमध्ये भरीव कामगिरी करीत आपल्या कार्यपद्धतीतील सुधारणा, वेगवान निर्णयप्रक्रिया, आणि उत्पादन क्षमतेत वाढ साधली. विशेषतः महानिर्मितीतर्फे ऊर्जानिर्मितीत आधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि कार्यालयीन सुसज्जता व पर्यावरणपूरक उपाययोजना यांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.महानिर्मितीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांनी या यशाबद्दल सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून, ही कामगिरी केवळ पुरस्कारासाठी नव्हे तर जनतेसाठी अधिक चांगल्या सेवा पुरविण्याच्या दृष्टीने कटिबद्धतेचे प्रतिक आहे, असे ते म्हणाले. या पुरस्कारातून प्रेरणा घेत अधिक कार्यक्षमतेने राज्यातील वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी कटिबद्ध होण्याचे आवाहन त्यांनी केले. या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा अभिनव मोहिमेबद्दल राधाकृष्णन बी. यांनी शासनाचे विशेष आभार मानले.महानिर्मितीचे संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) संजय मारूडकर आणि संचालक (प्रकल्प) अभय हरणे यांनी या सांघिक यशाबद्दल सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, वरिष्ठ अधिकारी तसेच सर्व अभियंता आणि कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन केले.

# शिवराज्याभिषेक सोहळ्याचे काटेकोरपणे नियोजन करा -मंत्री भरत गोगावले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड किल्ला येथे शिवराज्याभिषेक सोहळ्याचे तिथी व तारखेनुसार अनुक्रमे ६ व ९ जून रोजी आयोजन करण्यात आले आह. या कार्यक्रमाच्या नियोजनाची रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षते खाली सर्व प्रमुख विभागांची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी या कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन करण्याच्या सुचना त्यांनी सर्व यंत्रणेला दिल्या.

महाड शासकीय विश्रामगृहात आयोजित या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अप्पर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके यांसह विविध विभागाचे अधिकारी व कोकणकडा मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले की ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा आपल्या अस्मितेचा विषय आहे. गेली ३५ वर्ष हा उत्सव सुरु आहे. या कार्यक्रमाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे हा कार्यक्रम सुनियोजित व सुव्यवस्थितपणे पार पडण्याची जबाबदारी सर्वांवरच आहे. तेव्हा प्रत्येकाने आपले काम चोखपणे करावे.

शिवभक्तांना सर्व सोयी सवलती विहित मुदतीत उपलब्ध करून द्याव्यात त्यामध्ये कुठलेही हयगय करू नये असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यंदा मान्सून लवकर सुरु झाला आहे. त्यामुळे पावसाची शक्यता लक्षात घेऊन मंडप, भोजन, विद्युत आणि आरोग्य व्यवस्था तैनात ठेवाव्यात. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वैद्यकीय पथक सुसज्ज ठेवावे, गडावर पुरेश्या प्रमाणात वैद्यकीय पथक, स्ट्रेचर, औषधसाठा ठेवावा. विशेषता सर्पदंश होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्याप्रमाणे औषधे उपलब्ध ठेवावीत. जिल्हा प्रशासनाने कार्यक्रम नियोजनासाठी गठीत केलेल्या समित्यानी आपली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी असेही गोगावले यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले की, शिवराज्याभिषेक सोहळयानिमित्त किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने वेगवेगळ्या समित्याची नेमणूक केली आहे. मुख्यत्वे आरोग्य,पाणी पुरवठा,मंडप,खानपान, राजशिष्टाचार,परिवहन, विद्युत, पाणी आणि शौचालय आदी सर्व समित्यांची नेमणूक केली आह. सर्व नियोजन सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.





कर्जत : हर्षल मच्छिंद्र देशमुख (रा. माणगाव) याला दहावीला ७८% गुण मिळाले. त्याबद्दल काका तानाजी देशमुख यांनी अभिनंदन केले.

## अलिबाग-धरमतर व मांडवा मार्गांवर अवजड वाहनांना बंदी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग ते मांडवा जेट्टी व अलिबाग ते धरमतर या मार्गांवर सध्या मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी व अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याठिकाणी जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, या मार्गांवरून मांडवा जलवाहतूक सेवा, पर्यटकांची वाहने तसेच डंपर, ट्रक, सिमेंट मिक्सर सारखी अवजड वाहने एकाच वेळी ये-जा करत असल्याने वाहतूक कोंडी व अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. विशेषतः शनिवार-रविवारच्या सुटीच्या दिवशी पर्यटकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढते.

या पार्श्वभूमीवर, स्थानिक नागरिक व पर्यटक यांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा, अपघातांचे प्रमाण कमी व्हावे तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये याकरिता, दि. १७ व १८ मे आणि दि. २४ व २५ मे या दोन आठवड्यांत सकाळी८ते रात्री १० वाजेपर्यंत या मार्गांवर जड व अवजड वाहनांची वाहतूक बंदी घालण्यात आली आहे.ही वाहतूक बंदी फक्त जीवनावश्यक सेवा पुरवणाऱ्या वाहनांकरिता लागू राहणार नाही.

# कर्जतमध्ये आढळला दुर्मिळ धेनुगळ शिलालेख

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत हे केवळ निसर्गसंपन्न पर्यटनस्थळ नसून ते एक समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभलेले ठिकाण आहे. या परिसरात अनेक किल्ले, लेण्या, घाटवाटा तसेच शतकानुशतकांचा इतिहास साठवून ठेवणाऱ्या वास्तू आढळतात. कर्जत मध्ये कायम भटकंती करणाऱ्या एका समूहाला अशीच एक ऐतिहासिक गोष्ट सापडली आणि ती म्हणजे धेनुगळ शिलालेख.



राजमाची,पेठ,तुंगी, पदरगड आणि सोनगिरी हे येथील काही प्रमुख किल्ले आणि डोंगरी भाग असून, ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी आणि मराठा साम्राज्याच्या लढायांशी संबंधित आहेत. कोंढाणे लेण्या या बौद्ध कालखंडातील असून त्यातील कोरीव काम आणि शिल्पकला आजही थक्क करून टाकते. या भागातील कड्यातून जाणाऱ्या प्राचीन घाटवाटा, जसे की कुसुर घाट , फेण्यादेवी घाट किंवा भिमाशंकर घाट, या व्यापारी आणि सैनिकी दृष्टिकोनातून फार महत्त्वाच्या होत्या.

कर्जतच्या गावागावांमध्ये विखुरलेल्या विरघळी, बारव विहिरी, तसेच जुन्या समाध्या, हे सर्व इथल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जिवंत दाखले आहेत. अशा या कर्जतच्या भूमीवर इतिहासाचे ठसे आजही अनेक ठिकाणी उमटलेले पाहायला मिळतात, जे अभ्यासकांना, इतिहासप्रेमींना आणि पर्यटकांना सारख्याच उत्कंठेने आकर्षित करतात.

कर्जत मधील कायम भटकंती करणाऱ्या अभिजीत मराठे , कौस्तुभ परांजपे, शर्वरीष वैद्य, रिनेश सोनावळे आणि मंदार लेले या समूहाला अशीच एक ऐतिहासिक गोष्ट सापडली आणि ती म्हणजे धेनुगळ. त्यातच धेनूगळ म्हणजे गाय वासरु दगड हे एक दानपत्र आहे. दान दिलेल्या गावाची, जमिनीची सीमा दाखवण्यासाठी धेनूगळ वापरला जात असे. या आयताकृती उभ्या दगडावर गाय आणि वासरू कोरलेले असते. वरच्या बाजूला सूर्य आणि चंद्र कोरलेले असतात. गाय हे राजाचे प्रतिक असून वासरू हे प्रजेचे प्रतिक आहे. गाय ज्याप्रमाणे वासराचे पालन करते तसेच राजा प्रजेचे पालन करतो. या गाय वासरू दगडांवर काही ठिकाणी शिलालेखही कोरलेले पाहायला मिळतात. धेनुगळ ही फार दुर्मिळ असून मोजक्याच ठिकाणी पहायला मिळते. कुसूर घाट हा ट्रेक करताना ही शिळा पहायला मिळाली. कुसूर घाटाच्या जंगलात धेनूगळ सापडली . ह्या धेनुगळी चा हे ट्रेकर्स अजून अभ्यास करणार आहेत.

# डॉ. चिंतामणराव देशमुखांच्या स्मारकाची दुरवस्था

**धाटाव : प्रतिनिधी**

गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थांना शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी रोहा नगरपालिकेने डॉ. चिंतामणराव देशमुख वाचनालय व स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेची निर्मिती केली. स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक साहित्य या वाचनालयात उपलब्ध केले.मात्र आता या वाचनालयाची पार दुरवस्था झाली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाला येणाऱ्या विद्यार्थांना अनेक समस्यांना सामोरे जावं लागतंय.



सप्टेंबर २०२१ मध्ये डॉ. चिंतामणराव देशमुख स्मारक इमारतीच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. कासवगतीने सुरू असलेले हे काम साडेतीन वर्षे झाली तरी पुर्ण झालेले नाही. तेव्हापासून या वाचनालयाची दुरावस्था झाली आहे. सद्या या वाचनालयाची रवानगी नगरपालिकेच्या जिजामाता भवन येथील आई एकवीरा सभागृहात करण्यात आली आहे. मात्र या सभागृहात आधीपासूनच नियमितपणे महिलांसाठी योगासनांचे प्रशिक्षण दिले जाते.

योगासनांसाठी लागणारे साहित्य आणि पुस्तके एकाच कपाटात ठेवले जात असल्याने वाचनालयाला गोडाऊनचे स्वरूप आले आहे. स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी याबाबत चीड व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या वाचनालयाची दुरवस्था झाल्याची विद्यार्थ्यांची भावना आहे. वारंवार तक्रारी करुनही पालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे विद्यार्थ्यांच्या पालकांचे म्हणणे आहे. सद्या हे वाचनालय म्हणजे समस्यांचं आगर बनले आहे. तेथील स्वच्छता गृहांचा प्रश्नही गंभीर आहे. नगरपालिका प्रशासनाने यावर लवकरच तोडगा काढणार असून, विद्यार्थांना सर्व सोयी सुविधा पुरवण्यात येतील अशा नवीन जागेत वाचनालय स्थलांतरित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

यापुढे डॉ. चिंतामणराव देशमुखांची अवहेलना सहन केली जाणार नाही. 'डॉ चिंतामणराव देशमुख वाचनालय व स्पर्धा परीक्षा अभ्यासिका' तातडीने चांगल्या आणि सुसज्ञ जागेत हलवावी, तसेच रोहा कोलाड रस्त्यावरील अनेक वर्षांपासून रखडलेले डॉ चिंतामणराव देशमुख प्रवेशद्वाराचे बांधकाम लवकर पूर्ण करण्यात यावे अन्यथा रोहा सिटिझन फोरमच्या माध्यमातून तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा अध्यक्ष नितीन परब यांनी दिला आहे.

# माणगावातील महामार्गाचे चौपदीकरण वादाच्या भोवऱ्यात

## उच्च न्यायालयाच्या आदेशाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल ते रत्नागिरी या ४०० किमी अंतरावरील सर्व प्रकारची अनाधिकृत आणि बेकायदेशीर बांधकामे केंद्रीय रस्ते विकास महामंडळाने हटविली तर अडथळे करणार्या इमारतींच्या मालकांना नुकसान भरपाई देऊन मोबदला देण्यात आला. मात्र माणगाव शहरातील अनधिकृत बांधकामे गेली १७ वर्षे हटविण्यात न आल्याने सर्वांनाच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने महामार्गावरील बांधकामे हटवून महामार्ग मोकळा करावा असे आदेश देऊन सुद्धा आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. ह्या बहूचर्चित महामार्गाचे चौपदीकरण वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.



मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करताना माणगाव आणि इंदापूर शहरातील महामार्गाचे रुंदीकरण केले गेले नाही. याबाबत मुंबई उच्च न्यायालयात दोन जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यावेळी महामार्गावरील सर्व बेकायदेशीर आणि अनाधिकृत बांधकामे पाडण्यात यावीत असे आदेश देण्यात आले होते. परंतु महामार्ग कार्यालयाने २००७ पासून केवळ नोटीसा देण्यात धन्यता मानली. मात्र ठोस उपाययोजना न करता न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा बेकायदेशीर बांधकामे वाढली आहेत. ती न तोडल्याने दररोजच्या दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

माणगाव शहरातील काळ आणि गोद नदी पुल नव्याने होत आहेत. त्यांचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मात्र माणगाव आणि इंदापूर येथील रस्त्याचे रुंदीकरण झालेले नाही. माणगाव बायपास होण्यासाठी किमान दोन वर्षे लागणार आहेत. तोपर्यंत शहरातील महामार्गाचे रुंदीकरण केल्यास वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरळीतपणे होउ शकते

माणगाव शहरात लागोपाठ अपघातात नागरिकांचे नाहक जीव गेले. त्यानंतर जन आक्रोश झाल्यावर मुंबई गोवा महामार्ग दोनदा रोखला गेला. प्रांताधिकारी यांनी त्यानंतर १३ मे रोजी सभा झाली. परंतु आवाज उठविणार्या पत्रकार आणि नागरीकांना बोलाविण्यात आले नाही. त्यामुळे निषेध करण्यात आला. कळमजे येथून सुरू होणाऱ्या बायपासचे काम रखडले आहे ते आता पावसाळ्यानंतर सुरू होईल. हा बायपास मुगवली फाटा येथे महामार्गाला जोडतो. या बायपास रस्ता करताना काळ नदी उतेखोल आदीवासी वाडी, भादाव, विंचवली अशा तीन पुलांची कामे संथगतीने सुरू आहेत. बायपास रस्ता अर्धवट अवस्थेत आहे.

बायपास आणि महामार्ग ही दोन्ही कामे वेगवेगळ्या ठेकेदारांना दिली आहेत. माणगाव आणि कळमजे पुलांची कामे संथगतीने सुरू आहेत. शहरातील हातगाड्या, टपर्या, शेड, रिक्षा स्थानक हटविण्यात आले तरीहि वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार नाही असे दिसते

## निवडक

### ट्रेलरच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** ट्रेलरने सायकलला धडक दिल्याने २१ वर्षीय धीरज श्रीनारायण पांडे याचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रेलर चालक इर्शादअली ईशाक अली खान याच्या विरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वावंजेतील धीरज पांडे हा जिओ पेट्रोल पंप येथे सिक्युरिटीचे काम करत होता. तो ड्युटी संपवून त्याच्या मित्राला भेटण्यासाठी धानसर टोल नाका पनवेल मुंब्रा हायवे रोडने सायकलवरून जात असताना ट्रेलर (क्रमांक एमएस ४६ एच १७९२) चालकाने त्याच्या सायकलला धडक दिली. या अपघातात धीरजच्या डोक्याला गंभीर दुखापती झाल्या. त्याला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** नेरे शंकर मंदिराजवळ दुचाकीच्या झालेल्या अपघातात कोप्रोली, रॉयल पाम्स रेसिडेन्सी येथे राहणार्या मितेश मललेश दवणे (३४) या तरुणाचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.ॲक्टिव्हा स्कुटी क्रमांक एम एच ०१ डीडी ३०७६ वरील मितेश दवणे हा पनवेल माथेरान रोड ने मालडुंगे बाजूकडे जात होता. नेरे शंकर मंदिराजवळचा रस्ता वळणावळणाचा व लहान असल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याची दुचाकी नेरे येथील शंकर मंदिराजवळील शेतात सात ते आठ फूट खाली जाऊन कोसळली. यात मितेश हा गंभीर जखमी झाला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

### रिक्षाचालकासह दोघांनी प्रवाशाला लुटले

**पनवेल :** ऑटो रिक्षातील चालक आणि दोन पॅसेंजरनी मारहाण करून चाकूचा धाक दाखवून तरुणाचा मोबाइल आणि रोख रकमेची चोरी केली. मिथुन चव्हाण याने (वय १९, रा. घोटगाव) नितळस फाटा येथे रात्री साडेदहाच्या दरम्यान शेअरिंग ऑटो रिक्षामध्ये बसला. त्यात दोन माणसे आधी बसली होती. त्यानंतर ऑटो रिक्षा कंपनीच्या बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत नितळस रोड येथे आली असता ऑटोचालकाने लघुशंकेसाठी रिक्षा उभी केली. त्यानंतर दोघांनी मिथुनला मारण्यास सुरुवात केली. याबाबत ऑटोचालकाकडे मदत मागितली असता त्यानेही मारहाण केली. त्यातील एकाने खिशातील चाकू काढून गळ्याला लावला आणि मोबाइल आणि खिशातील तेराशे रुपये काढून घेतले. त्यानंतर मिथुन याला तेथेच टाकून तिघेही ऑटो रिक्षाने डोंबिवली-ठाण्याच्या दिशेने निघून गेले.

### पनवेल स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील रिक्षा स्टॅण्डच्या फुटपाथवरील बाकड्यावर सेक्टर नं.१५, नवीन पनवेल या ठिकाणी एका इसमाचा मृतदेह आढळून आला सदर अनोळखी इसमाचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, रंग गहुवर्णीय, डोक्याचे केस काळे पांढरे, उंची ५ फुट, शरीर सडपातळ, नाक सरळ, दाढी पांढरी काळी बारीक, अंगात पांढरा हाफ टी-शर्ट व त्यावर पुढील बाजूस जय भोले व शंकराचे चित्र आहे. तसेच निळसर रंगाचा मळकट बरमुडा, गळ्यात पंचरंगी धागा बांधलेला आहे. उजव्या हाताच्या पोटरीवर मंगेश व बदाम गोंदलेले आहे. तसेच दंडावर हनुमानाचे चित्र गोंदलेले आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा सहा.पो. नि.पांडुरंग घागरे यांच्याशी संपर्क साधावा.

# रसायनी-मोहोपाड्यात ‘अवकाळी’चा तडाखा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी-पाताळगंगा विभागात शुक्रवार (दि.१६ ) रोजी जोरदार सोसाट्याचा वारा व आलेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत होऊन मोहोपाडा मुख्य रस्त्यावर पाणीच पाणी झाल्याचे पहावयास मिळाले.

शेतकर्‍यांसह इतर क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिक, विक्रेते, वीटभट्टी व्यावसायिक, आंबा उत्पादक व जनावरांचा चारा, सर्वसामान्य गरीब नागरिकांचे लाकूडफाटा आदींचे मोठ्या प्रमाणात भिजून नुकसान झाले आहे.रसायनी परिसराचा मोहोपाडा हे मुख्य बाजारपेठेचे केंद्रबिंदू आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रस्त्यालगत अतिक्रमण वाढल्याने शिवाय रस्त्यालगतचा सांडपाणी वाहतूक नाला तुटूंब भरल्याने मोहोपाडा नविन पोसरी कमानी ते सेबी वळण या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले.यामुळे वाहनांना आपले वाहन चालविताना कसरत करावी लागत होती.तर सेबी वळणाजवळ रस्त्यालगत भगदाड पडल्याने यातच साचलेल्या पाण्याचा अंदाज न आल्याने दुचाकींना अपघात झाला.

लग्नसराई सुरू असल्याने अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे लग्नमंडपात जमलेल्या वऱ्हाडी मंडळींची चांगलीच तारांबळ उडाली, मंडपात जमलेले वधूवरांसह सगळेच पावसाने ओलेचिंब झाले. तर आंबा उत्पादक शेतकर्‍यांच्या आंब्याच्या झाडांवरील तयार झालेला व हातातोंडाशी आलेला आंबा गळून पडल्याने त्यांचे देखील नुकसान झाले आहे. जांभळे व काजू सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पडून नुकसान झाले होते. यासोबतच वीटभट्टी व्यावसायिक यांच्या कच्चा विटा भिजल्याने त्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच ठिकठिकाणी वृक्षाच्या फांद्या कोसळल्या होत्या.



# प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांचा आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी अलीकडेच ७ मे ते १० मे २०२५ दरम्यान श्रीलंकेत झालेल्या आंतरराष्ट्रीय दर्जेदार शिक्षण परिषदेत प्रमुख वक्ते आणि सादरकर्ता म्हणून भाग घेतला. ही परिषद इंटरनॅशनल असोसिएशन फॉर क्वालिटी एज्युकेशन (I-FQE) द्वारेआयोजित करण्यात आली होती आणि श्रीलंका सरकारच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याने दक्षिण आशियातील नामांकित शैक्षणिक संस्थांनी आयोजित केली होती.



परिषदेदरम्यान, भारत, नेपाळ आणि बांगलादेशमधील प्रतिनिधींनी २५० हून अधिक श्रीलंकेच्या शिक्षकांसह श्रीलंकेच्या उवा प्रांतातील पूर्व-प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना भेटी दिल्या. उवा प्रांताचे राज्यपाल जे.एम. कपिला जयसेकरा आणि उवा प्रांताचे मुख्य सचिव महेश एल. गम्मामपिला यांच्यासोबत एक अधिकृत बैठक आयोजित करण्यात आली. सचिवांनी २०२६ पर्यंत अंमलबजावणीसाठी नियोजित भविष्यातील शैक्षणिक सुधारणा सामायिक केल्या आणि शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान आणिअभ्यासक्रम विकास यासारख्या क्षेत्रात सहकार्यासाठी भारतीय प्रतिनिधींना आमंत्रित केले होते.शैक्षणिक देवाणघेवाणीतील योगदानाबद्दल, उवा प्रांताच्या राज्यपालांनी भारतीय शिष्टमंडळाचा ट्रॉफी देऊन गौरव केला.

अविनाश कुलकर्णी यांनी कोलंबो येथील पश्चिम प्रांतीय परिषदेत पंचकोश मॉडेलसह स्टीमएज्युकेशन या विषयावर मुख्य भाषण दिले. त्यांच्या सादरीकरणात लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलकामोठे येथील ॲक्टीव्हीटी, पारंपारिक भारतीय तत्वज्ञान, व आधुनिक अध्यापनशास्त्राशी जोडण्यावर भर देण्यात आला. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांनी त्याचे खूप कौतुक केले. दर्जेदार शिक्षण मजबूत करण्यासाठीश्रीलंकेला पाठिंबा देण्याची भारताची तयारी त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कुलकर्णी यांना श्रीलंका सरकारच्या शिक्षणसचिव आणि कोलंबोमधील भारतीय उच्च आयोगाच्या प्रथम सचिव रोशनी थॉमसन यांनी सन्मानित केले.

कुलकर्णी यांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय शैक्षणिक उत्कृष्टतेचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर, सातारा यांनी सन्मानीत केले व पुढील वाटचालीस शुभ आशीर्वाद दिले.

## पनवेल तालुका पत्रकार विकास मंचकडून अविनाश कोळींचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी संघटन कौशल्य असलेले अविनाश कोळी यांची पुनर्नियुक्ती झाल्यानिमित्त पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

अविनाश कोळी हे पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे सल्लागार असून त्यांनी या मंचच्या अध्यक्षपदाचीही जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली आहे. त्यांच्या निवडीमुळे मंचच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मंचचे ज्येष्ठ सल्लागार माधव पाटील, सल्लागार विवेक पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, सरचिटणीस हरेश साठे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, कार्यकारिणी सदस्य नितीन कोळी, प्रवीण मोहोकर, राजू गाडे यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

सत्कार स्वीकारताना अविनाश कोळी म्हणाले, पत्रकारिता आणि राजकारण यांचे अतूट नाते आहे. मी स्वतः पत्रकार म्हणून काम करून आज राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. पत्रकारितेतील अनुभवामुळे संघटनात्मक कामात नेहमीच मदत झाली आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचशी असलेली माझी नाळ कायमची जोडलेली आहे. आजचा हा सत्कार माझ्यासाठी प्रेरणादायी आहे, असे सांगत आपल्या सहकाऱ्यांकडून होणारा हा सत्कार मला यापुढेही प्रेरणा देणारा ठरणार आहे. राजकीय जबाबदारी पार पाडत असताना सामाजिक कार्य महत्वाचे असते त्याची सांगड घालत माझ्यावर टाकलेला विश्वास पुन्हा सार्थ करण्यासाठी कार्यरत असल्याचेही त्यांनी सत्काराच्या निमित्ताने अधोरेखित केले.



## चिरनेरमध्ये संकष्ट चतुर्थीमुळे नागरिकांना मिळतोय रोजगार

**उरण :** उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्ट चतुर्थी निमित्ताने काल शुक्रवारी गणेशभक्तांनी पेशवेकालीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. या वेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी नवविवाहित जोडप्यांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात अशी गणेश भक्तांची श्रद्धा आहे. या श्रींच्या देवस्थानामुळे चिरनेर परिसरातील नागरिकांना दर महिन्याला रोजगार तर मिळाला. परंतु मुंबई, नवी मुंबईच्या



व्यावसायिकांनादेखील दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने व्यवसाय मिळाला असल्याची माहिती येथील व्यावसायिकांनी दिली.

## खाने आंबिवलीत घरगुती वादातून मारहाण

**मोहोपाडा :** मोहोपाडा हद्दीतील आंबिवली तर्फे तुंगारतन येथे कौटुंबिक वादातून हाणामारी झाली असून रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार निलेश नथू कांबळे (वय३६) यांच्या घरासमोर उभे असताना आरोपी प्रफुल्ल भगवान सोनावळे (वय ३२) याने तिथेच पडलेला दांडका फिर्यादीच्या डोक्यात मारून हाताच्या दंडावर, पायावर दुखापती केल्या आरोपी प्रफुल्ल सोनावळे याच्यावर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## महापालिकेच्या मान्सूनपूर्व सफाई कामांना वेग

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्याला अवघे काहीच दिवस शिल्लक राहिले आहेत, या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेने खारघर सेक्टर १२ मधील मुख्य नाल्याच्या साफसफाईचे काम सुरू केल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

खारघरमधील पांडवकड़ा धबधबा डोंगरावरून पावसाचे पाणी हे सेक्टर ६मधून सेक्टर १२ वसाहतीमधून खाडीत वाहून जाते. पावसाळ्यात खारघर डोंगरावर मुसळधार पाऊस झाल्यास सेक्टर १२ मधील नाला दुथडी भरून वाहत असतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी या नाल्यांची साफसफाई करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे हा नाला सेक्टर १२ मधील वसाहतीच्या मध्यभागी आहे. पालिकेकडून राबविल्या जाणार्या स्वच्छता अभियानच्या वेळी नागरिकांनी घरातील कचरा पालिकेच्या घंटागाडीत टाकावा, याविषयी आवाहन करूनही बहुतांश नागरिक याकडे दुर्लक्ष करून नाल्यात कचरा टाकत असल्यामुळे नाला कचरामय झाला आहे.

पालिकेकडून जेसीबी लावून या नाल्यातील कचरा आणि वाहून आलेली माती साफसफाई केली जात आहे. नालेसफाई करताना रस्ते आणि पदपथावर मातीचे ढिगारे राहणार नाहीत, याची काळजी पालिका घेत असल्याचे खारघरचे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी सांगितले.

### प्लास्टिक आणि पानवेलींचे जाळे

*खारघरमधील सर्व नाल्यात पानवेली मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. तसेच झाडे-झुडपे आणि प्लॅस्टिक कचरा नाल्यात पडून आहे. आओचे आणि खारघर डोंगरावरील पावसाचे पाणी या नाल्यातून खाडीत वाहून जात असते. पावसाळ्यात हे नाले दुथडी भरून वाहतात. पालिकेने सेक्टर १२प्रमाणे खारघर वसाहतीमधून खाडीत जाणाऱ्या इतर नाल्यांची साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी खारघरवासीयांकडून केली जात आहे.*

### काढलेला गाळ तत्काळ उचलावा!

*खारघर सेक्टर १२ मधील नालेसफाईचे काम पालिकेकडून हाती घेण्यात आले आहे. जेसीबीच्या मदतीने नाल्याची साफसफाई करताना नाल्यात साचलेला कचरा आणि माती एका बाजूला केली जात आहे. पालिकेने जमा झालेला कचरा तत्काळ बाहेर काढणे आवश्यक आहे. खारघर डोंगरावर मुसळधार पाऊस पडल्यास नाल्यातील कचरा पुन्हा नाल्यात अडकून नाला जैसे थे होऊ शकतो. पालिकेने याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी सांगितले.*



## संपादकीय

# गंभीर प्रश्नचिन्ह

विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना कालमर्यादा निश्चित केली जावी या सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निकालावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्या निकालाविषयी राष्ट्रपती मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला चौदा प्रश्न विचारले आहेत. नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांना न्यायसंस्थेपुढील या आव्हानाला आता सामोरे जावे लागणार असून या वादाला आलेले हे स्वरूप गंभीर असेच आहे. संपूर्ण घटनापीठासमोर हे प्रश्न जाण्याची शक्यता आहे.

**एप्रिल महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी विरुद्ध राज्य सरकार यांच्या खटल्यात विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांना एका विशिष्ट कालमर्यादेत मंजुरी द्यावी वा ती नामंजूर करावीत असे निर्देश दिले. त्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित केली. संविधानाच्या कलम २०१ नुसार राज्यपाल वा राष्ट्रपती यांच्यावर अशी कोणतीही कालमर्यादा घालण्याची तरतूद नाही याकडे लक्ष वेधत आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे स्पष्टीकरण मागितले आहे. राज्यपालांपुढे विधेयक सादर झाल्यावर त्यांच्यासमोर कोणते घटनात्मक पर्याय असतात, मंत्रिमंडळाचा सल्ला स्वीकारणे राज्यपालांना बंधनकारक आहे का, कलम २०० अंतर्गत राज्यपालांच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येते का, कलम ३६१ नुसार राज्यपालांच्या निर्णयाचा न्यायालयीन आढावा घेण्यास प्रतिबंध आहे का, तसेच घटनेत राज्यपालांनी विधेयकांवर निर्णय घेण्यासंदर्भात कालमर्यादा नसेल तर न्यायालय ती ठरवू शकते का, कलम १४२ अंतर्गत राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांनी दिलेले आदेश बदलता येतात का आणि कलम २०० नुसार राज्य विधिमंडळाने केलेला कायदा राज्यपालांच्या मान्यतेशिवाय अमलात येतो का आदि १४ प्रश्न मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारले आहेत. तमिळनाडू सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर संविधानाच्या कलम २००शी निगडित निकाल सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल महिन्यात दिला होता. तमिळनाडूचे राज्यपाल टी.एन.रवी यांनी राज्याच्या विधिमंडळाने संमत केलेली दहा विधेयके अडवून ठेवणे हे बेकायदेशीर असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. राज्यपालांनी ही विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ अडवून ठेवली होती. राज्यपालांकडे दुसऱ्यांदा विधेयके सादर केल्याच्या तारखेपासून सदर विधेयके मंजूर झाल्याचे मानले जाईल असेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या कलम १४२ नुसार आपले अधिकार वापरून संबंधित दहा विधेयके मंजूर केल्याचेही त्यावेळी म्हटले गेले होते. स्वाभाविकच 'न्यायालयीन सक्रियता' या स्वरूपाचा हा निर्णय असल्याचा मुद्दा त्यावर उपस्थित करण्यात आला. तमिळनाडूच्या प्रकरणाच्या पलीकडे जाऊन अधिक दूरगामी व व्यापक परिणाम घडवणारा असा हा निकाल होता. इतक्या गंभीर विषयावर घटनेचा अन्वयार्थ लावताना किमान पाच सदस्यांच्या खंडपीठाने निकाल देणे अपेक्षित आहे असा आक्षेपही आता दिसतो. तमिळनाडूचा निकाल दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला होता. भारतीय राज्यघटनेचे तीन प्रमुख आधारस्तंभ आहेत. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. या तिन्ही स्तंभांमध्ये घटनाकारांना जे संतुलन अभिप्रेत होते त्याचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. घटनाकारांनी कोणत्याही स्तंभाला अमर्याद अधिकार दिलेले नाहीत. राज्यपाल हे केंद्राच्या हातातील बाहुले बनतात अशी टीका नेहमीच होत आली आहे. मात्र, राष्ट्रपतींच्या अधिकारांवर बंधने घालण्याचे कृत्य कधीही घडले नव्हते. सर्वोच्च न्यायालयाला राष्ट्रपतींच्या प्रश्नांना उत्तर देणे बंधनकारक असून हे उत्तर निश्चितच दूरगामी परिणाम करणारे ठरेल.**

# घरच्या घरी पहा बियाण्याची उगवणक्षमता!



खरीप हंगाम जवळ आला की शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू होते. उत्पादनात भरघोस वाढ व्हावी, यासाठी बियाण्याची निवड हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा ठरतो. अनेकदा शेतकरी बांधव दरवर्षी बाजारातून नवे बियाणे खरेदी करतात, परंतु हे बियाणे महाग असतानाही त्याची उगवणक्षमता कितपत योग्य आहे, हे निश्चित नसते. अशा वेळी वेळ, श्रम आणि पैसा वाया जाण्याचा धोका असतो. त्यामुळेच 'उगवणक्षम बियाणं' वापरणे हा खरीप यशस्वी करण्याचा मूलमंत्र ठरतो.

या लेखातून आपण बियाण्याची उगवणक्षमता का तपासावी, त्याचे फायदे काय आहेत, आणि घरच्या घरी ती कशी तपासायची याबाबतच्या सोप्या आणि वैज्ञानिक पद्धती जाणून घेणार आहोत. जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयाच्या सौजन्याने ही माहिती तुमच्यापर्यंत पोहचवत आहोत!

✻ दरवर्षी नवीन बियाणे खरेदी करणे गरजेचे आहे का?

अनेक शेतकरी बांधवांचा समज असतो की प्रत्येक वर्षी नवीन बियाणे बाजारातून विकत घेऊनच पेरणी करावी. मात्र, सोयाबीन, मूग, उडीद, गहू, चवळी, भुईमूग यांसारखी पिकं स्वपरागसिंचीत असल्यामुळे त्यामध्ये संकरीत वाणांचा प्रश्न नसतो. त्यामुळे एकदा प्रमाणित बियाणे विकत घेतल्यावर त्यापासून तयार झालेल्या पिकाचे बियाणे पुढील दोन वर्षे वापरता येते.

यामुळे दरवर्षी नवीन बियाण्यावर होणारा अनावश्यक खर्च टाळता येतो, पण हे बियाणे वापरण्यापूर्वी त्याची उगवणक्षमता तपासणे अत्यावश्यक असते.

✻ बाजारातील बियाण्यांवर अवलंबून राहणे का धोकादायक ठरते?

कधीकधी विकत घेतलेले बियाणे उगवत नाही. अशावेळी शेतकरी बांधवांनी खते, मेहनत, वेळ आणि पैसा खर्च केलेला असतो. पेरणी कालावधीही निघून जातो. नंतर लेखी तक्रार, पंचनामे, नुकसानभरपाईसाठी प्रयत्न यामुळे मानसिक व आर्थिक त्रास होतो.

यावर उपाय म्हणजे– बियाण्याची उगवणक्षमता तपासूनच पेरणी करणे. ही तपासणी आपण घरी सहज करू शकतो.

✻ उगवणक्षमता तपासणीच्या तीन सोप्या पद्धती

गोणपाट वापरून तपासणी : प्रत्येक पोत्यातून थोडे बियाणे घेऊन एकत्र करा. १०० दाण्यांचे ३ नमुने तयार करा. ओल्या गोणपाटावर दाणे १०–१०च्या रांगेत लावा. वरून दुसरा ओला गोणपाट घाला आणि गुंडाळी करून सावलीत ठेवा. ६–७ दिवसांनी उगवलेले दाणे मोजा.७०% किंवा त्यापेक्षा अधिक उगवणक्षमता असल्यास बियाणे योग्य.

✻ रद्दी पेपर वापरून तपासणी : रद्दी पेपरला चार घड्या घालून ओले करा. प्रत्येकी १० बियांच्या १० ओळी तयार करा (एकूण १०० बिया).गुंडाळ्या करून पिशवीत ठेवा.दिवसांनी अंकुर आलेल्या बिया मोजा. ७०% किंवा अधिक बिया उगवल्यास बियाणे योग्य समजावे.

✻ पाण्यात भिजवून त्वरित तपासणी : १०० दाण्यांचे ३ संच तयार करा.५–७ मिनिटे पाण्यात ठेवा.टरफल सुरकुतलेले/फुगलेले दाणे वगळा. फुगलेले दाणे – खराब. टरफल शाबूत व सुरकुत्या नसलेले दाणे – चांगले.७०% किंवा अधिक दाणे चांगले असल्यास बियाणे वापरण्यास योग्य.

✻ पेरणीपूर्वी बियाण्यावर प्रक्रिया करणे का आवश्यक?

बियाणे कितीही चांगले असले, तरी त्यावर योग्य ती प्रक्रिया करणे अत्यावश्यक असते. बुरशीनाशक व जिवाणू संवर्धक यांची प्रक्रिया केल्यास बियाण्याच्या उगवणीत वाढ होते व रोगप्रतिकारशक्तीही वाढते. थोडक्यात सांगायचं झालं तर प्रत्येक वेळी बियाणे विकत घेण्याऐवजी उगवणक्षम बियाणे घरीच तयार करून वापरा.

पेरणीपूर्वी घरीच उगवणक्षमता तपासा


७०%हून अधिक उगवण असलेले बियाणे वापरण्यास हरकत नाही. उगवणक्षमता कमी असल्यास प्रमाण वाढवून पेरणी करा. बुरशीनाशक आणि जिवाणू संवर्धक प्रक्रिया करू नका विसरू.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा

आपल्या गावातील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी हे यासाठी मार्गदर्शनासाठी उपलब्ध आहेत.

(साभार : माहिती व जनसंपर्क जनसंचालनालय)

# ...म्हणून आज साजरा होतो जागतिक दूरसंचार दिवस



प्रत्येक वर्षी १७ मे रोजी, जागतिक दूरसंचार दिवस साजरा करण्यात येतो. तर आम्ही जाणून घेऊ जागतिक दूरसंचार दिवसाचा इतिहास आणि हा का म्हणून साजरा करण्यात येतो येथे सांगण्यात येत आहे.

संचारच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि जगभरात याचे माहिती वाढवण्यासाठी प्रत्येक वर्षाच्या १७ मे रोजी जागतिक दूरसंचार दिवस साजरा करण्यात येतो. म्हणून हा दिवस संचारच्या विकासासाठी समर्पित आहे.

टेलिफोनच्या आधी तारेने संदेश दिले जात होते. त्याचा विस्तार करण्यासाठी १७ मे १८६५ला इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनची स्थापना झाली. यानिमित्ताने हा दिवस १९७३ पासून साजरा होऊ लागला. मात्र २१ व्या शतकाच्या सुरुवातीपासून संदेश व संवाद माध्यमांमध्ये आमूलाग्र बदल होत गेले. या श्रेणीत मोबाइल, इंटरनेट आले. यामुळे आतापर्यंत 'जागतिक दूरसंचार' नावे साजरा होणारा हा दिन जागतिक दूरसंचार व माहिती दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय २००६ मध्ये घेण्यात आला. तेव्हापासून हा दिन दरवर्षी साजरा होत आहे तसेच हा दिवस या हे ही संकेत देतो की आमच्या जीवनात संचार किती महत्त्वपूर्ण आहे आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विकासालादेखील प्रोत्साहित करतो.

दूरसंचार काय आहे, हे तुम्हाला माहीत आहे का? एक संचार जो केबल, टेलीग्राफ किंवा प्रसरण द्वारे दुरून केला जातो त्याला दूरसंचार म्हणतात. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे झाले तर आम्ही म्हणू शकतो की हे सिग्नल, संदेश, शब्द, लेखन, प्रतिमा आणि ध्वनी किंवा कुठल्याही प्रकारच्या माहितीचे संचारणं आहे. तंत्रज्ञानाच्या बगैर संचार सहभागांमध्ये माहितीचे आदान प्रदान शक्य नाही आहे.

घरगुती लॅण्डलाइनची संख्या झपाट्याने घसरत आहे. मोबाइल येण्याआधी ज्यांच्याकडे लॅण्डलाइन होते, तेच घरगुती फोन सध्या वापरात असल्याचे दिसून येते. इंटरनेट अर्थात ब्रॉडबॅण्ड सेवा ही लॅण्डलाइनशी संलग्न आहे. त्यांच्याकडेच आज लॅण्डलाइन आहेत. मात्र, यामध्ये देखील आता राऊटरचा पर्याय आहे. हे राऊटर वायरसह किंवा वायरविना पुरविणाऱ्यादेखील १५ हून अधिक कंपन्या आहेत. सोबतच विविध मोबाइल सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांचे हॉटस्पॉट डिव्हाईस आहेत. सीम कार्डवरील इंटरनेट हॉटस्पॉटद्वारे जोडण्याची सेवा उपलब्ध आहे. यामुळेच ब्रॉडबॅण्डसाठी लॅण्डलाइन वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. एकूणच दूरसंचार असे नाव असलेले हे क्षेत्र आज झपाट्याने केवळ भ्रमण संचार होत आहे. येत्या काही वर्षांत सर्वत्र केवळ मोबाइल तंत्रज्ञान असेल, असे चित्र आहे.

संचार लॅटिन शब्द communicatio मधून घेण्यात आला आहे. तसं तर संचारामध्ये विभिन्न तंत्रज्ञान सामील आहे, म्हणून बहुसंख्याक रूपात दूरसंचारचा उपयोग केला जातो. **(साभार : वेबदुनिया)**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅपवर मेसेज आल्यावर न बघता कळेल



तुम्ही व्हॉट्सअॅप युजर्स असाल तर ही बातमी नक्की वाचा. आज आम्ही तुम्हाला अशी ट्रिक सांगणार आहोत, जी ट्रिक ९० टक्के लोकांना माहिती नाही. फोन न बघता तुमच्या व्हॉट्सअॅपवर कुणाचाही कॉल किंवा मेसेज आला आहे, हे जाणून घ्यायचं असेल तर त्यासाठी एक मार्ग आहे. आता ही सेटिंग्ज किंवा हा मार्ग नेमका कोणता आहे, चला तर मग जाणून घेऊया व्हॉट्सअॅपवर वेगवेगळ्या प्रकारचे फीचर्स, अपडेट येत असतात. तुम्ही हे व्हॉट्सअॅप फीचर वापरल्यास तुम्हाला अगदी सहजपणे आणि तेही आनंद घेऊन व्हॉट्सअॅपचा वापर आणखी खास पद्धतीने करता येऊ शकतो.

व्हॉट्सअॅपवर युजरचा कॉल किंवा मेसेज आल्यास फोन न बघता कळू शकतं की फोन कुणाचा होता. यासाठी तुम्ही कस्टम रिंगटोन सेट करू शकता आणि तसे करणे खूप सोपे आहे. या सेटिंगसह, तुम्ही वेगवेगळ्या संपर्क किंवा ग्रुपसाठी वेगवेगळे गाणे (रिंगटोन) निवडू शकता. अँड्रॉईड फोन : सर्वप्रथम तुम्ही अँड्रॉईड फोनवर व्हॉट्सअॅप ओपन करा ज्या कॉन्टॅक्ट किंवा ग्रुपसाठी तुम्हाला वेगळी रिंगटोन सेट करायची आहे तो ओपन करा. त्यानंतर वरच्या बाजूला असलेल्या कॉन्टॅक्टच्या नावावर टॅप करा. कस्टम नोटिफिकेशन्स या पर्यायावर टॅप करा. हा पर्याय डिसेबल असल्यास 'कस्टम नोटिफिकेशन वापरा' या शेजारी टिक करा. आता नोटिफिकेशन टोन किंवा 'रिंगटोन'वर जाऊन तुमच्या आवडीची रिंगटोन निवडा. शेवटी जघ दाबा आणि सेटिंग सेव्ह होईल. त्याचप्रमाणे कॉलसाठी वेगळी रिंगटोन हवी असल्यास कॉल रिंगटोनच्या पर्यायात जाऊन बदल करू शकता. अशावेळी एखादा खास मेसेज किंवा कॉल आल्यावर तुम्हाला एक वेगळीच रिंगटोन ऐकू येईल आणि फोन न बघता तुम्हाला समजेल.

आयफोनवर व्हॉट्सअॅपच्या मर्यादांमुळे तुम्ही व्हॉट्सअॅपवरून थेट कस्टम रिंगटोन सेट करू शकत नाही, पण हे तुम्ही तुमच्या फोनच्या कॉन्टॅक्ट्स अॅपवरून थेट कस्टम रिंगटोन सेट करू शकत नाही, पण हे तुम्ही तुमच्या फोनच्या कॉन्टॅक्ट्स अॅपवरुन करू शकता. याविषयी पुढे विस्ताराने वाचा. आयफोनचे कॉन्टॅक्ट्स अॅप ओपन करा. तुम्ही ज्या युजर्ससाठी रिंगटोन सेट करू इच्छिता त्याचा कॉन्टॅक्ट उघडा. येथे एडिटवर टॅप करा. रिंगटोन किंवा टेक्स्ट टोनच्या पर्यायावर जा आणि तुमच्या आवडीची रिंगटोन निवडा. शेवटी DONEवर टॅपर करा.

# शिल्पकार रघुनाथ कृष्णाजी फडके



निमित्त

महाराष्ट्रातील ख्यातकीर्त शिल्पकार तसेच चित्रकार, संगीत तज्ज्ञ, साहित्यिक व ज्योतिषशास्त्राचे जाणकार अशी रघुनाथ कृष्णाजी फडके यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म २७ जानेवारी १८८४ रोजी मुंबईजवळील वसई येथे सामान्य कुटुंबात झाला. त्यांचे वडील कृष्णाजी हे वसई येथील न्यायालयात नोकरीस होते. रघुनाथ यांना लहानपणापासूनच मूर्तिकलेचा छंद होता. चित्रकार श्रीनिवासराव हरपणहळ्ळी हे त्यांचे पहिले कलागुरू. रघुनाथ यांच्यातील शिल्पकलेचे गुण त्यांनी ओळखले. त्यांच्या प्रोत्साहनाने फडके यांनी प्रवचन हे एका वृद्ध माणसाचे पहिले शिल्प घडवले. याच शिल्पाला बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात गव्हर्नरांच्या हस्ते सुवर्णपदक मिळाले. फडके यांचे हेच शिल्प पुढे भारत शासनातर्फे इंग्लंड येथील वेम्ब्ले आणि अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथील प्रदर्शनात पाठविण्यात आले.

फडके यांचा वयाच्या सोळाव्या वर्षी मनोरमाबाई यांच्याशी विवाह झाला, मात्र पत्नीचा सहवास अवघा बारा वर्षे टिकला. मध्यंतरीच्या काळात ताडदेव, मुंबई येथे त्यांनी आपला स्टुडिओ उभारला आणि देव–देवतांच्या मूर्ती बनवण्याचे काम सुरू ठेवले. १९१७च्या दरम्यान फडके यांनी 'हालती चालती मेणाची चित्रे' हे प्रदर्शन मुंबई येथे भरविले. या चित्रप्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद मिळाला. त्यांना अर्थप्राप्तीही चांगली झाली. त्यामुळे अशी चित्रप्रदर्शने ते नियमित भरवत असत. १९२५मध्ये इंग्लंड येथील वेम्ब्ले येथील प्रदर्शनात ही मेणाची हालती चित्रे त्यांनी पाठविली होती. तेथेही या प्रदर्शनाला खूप लोकप्रियता लाभली. १९२६मध्ये अमेरिकेच्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने फिलाडेल्फिया येथेही हे प्रदर्शन पाठविण्यात आले. यासाठी फिलाडेल्फियाच्या महापौरांकडून फडके यांना प्रशस्तीपत्रक मिळाले होते. अशी प्रदर्शने त्यांनी दहा वर्षे (१९१७–१९२७) भरविली.


फडके यांची कला विविध अंगाने बहरत होती. तो काळ भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा होता. त्यांच्या कलाकृतींवरही या वातावरणाचाही परिणाम झाला. मेणाचे हे पुतळे पाहून लोक थक्क होत. हेराल्ड या इंग्रजी वृत्तपत्राच्या आवृत्तीतदेखील या संदर्भात कौतुकाचे उद्गार आहेत. या प्रदर्शनामुळे फडके यांना खूप प्रसिद्धी मिळाली, मात्र एक इंग्रज पत्रकार बी.जी. हॉर्निमन यांच्या वक्तव्याने त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. त्यांनी मेणाचे पुतळे बनवणारा कारागीर म्हणून फडके यांची हेटाळणी केली आणि त्यापेक्षा शिल्पकार होण्याबाबत सुचविले. टीका आणि मनस्ताप सहन करखत नैराश्याच्या मनःस्थितीमध्ये त्यांनी हे प्रदर्शन यशाच्या अत्युच्च शिखरावर असताना बंद केले, परंतु फडके यांनी भरविलेल्या कला प्रदर्शनाचा मोठा फायदा त्यांना झाला. लोकमान्य टिळकांनी त्यांच्यावर पुणे येथील शिवाजी मंदिरासाठी शिवशिल्प–शिवछत्रपतींचा अर्धपुतळा करण्याचे काम सोपविले. हे स्मारकशिल्प कसे असावे याबाबत त्यांना मार्गदर्शनही केले. शिवरायांचे हे पहिले संगमरवरातले स्मारकशिल्प १९२३मध्ये शिवाजी मंदिरात बसविण्यात आले. १९३८मध्ये फडके यांनी धारच्या संस्थानिकांच्या आदेशावरून 'लक्ष्मी कला भवन' (आता ललित कला महाविद्यालय) ही कलेचे शिक्षण देणारी संस्था स्थापन केली. तेथे त्यांनी बरीच वर्षे कलेची सेवा केली. अनेक विद्यार्थी घडविले. १९६१मध्ये भारत सरकारने पद्मश्री या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. १९७२मध्ये धार येथील खंडेराव टेकडी येथे त्यांचे १७ मे १९७२ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# छातीत पित्ताचे आंबट ढेकर मिनिटात थांबवते 'हे' पाणी



अॅसिड रिफ्लक्स हे पोटाच्या सामान्य समस्यांपैकी एक आहे आणि त्याला छातीत जळजळदेखील म्हणतात. जेव्हा तुमच्या पोटातील हायड्रोक्लोरिक अॅसिड तुमच्या अन्ननलिकेमध्ये प्रवेश करते, म्हणजेच पोटातील अॅसिड अन्ननलिकेमध्ये परत जाते तेव्हा ही समस्या उद्भवते. या क्रियेला गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स देखील म्हणतात. जेव्हा असे होते तेव्हा छाती आणि घशात जळजळ जाणवते. या पोटाच्या समस्येची अनेक कारणे असू शकतात.

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अहवालानुसार, अॅसिड रिफ्लक्सवर उपचार न केल्यास काही वेळा गंभीर परिणाम होऊ शकतात. अॅसिड रिफ्लक्सच्या समस्येवर उपचार करण्यासाठी अनेकदा घरगुती उपाय देखील फायदेशीर असल्याचे दिसून आले आहे. त्यापैकीच एक आहे लिंबू पाण्याचा उपाय!

घशात जळजळ होणे, पोटाच्या वरच्या भागात अस्वस्थता जाणवणे, आम्लपित्त, जीभ आणि घशात वेदना, पोटात जास्त गॅस तयार होणे, छातीत दुखणे, अन्न गिळताना त्रास होणे ही त्याची काही प्रमुख लक्षणे आहेत.

अॅसिड रिफ्लक्सची अनेक कारणे असू शकतात, जसे की चुकीच्या वेळी खाणे, लठ्ठपणा, जास्त तेलकट आणि मसालेदार अन्न खाणे, धूम्रपान इ. याव्यतिरिक्त, कॅल्शियम चॅनेल ब्लॉकर्स, बीटा–ब्लॉकर्स आणि नायट्रेट्ससारखी काही औषधेदेखील अॅसिड रिफ्लक्स वाढवू शकतात.

पोटाच्या अनेक समस्यांवर लिंबू पाण्याचे सेवन फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. हे अॅसिड रिफ्लक्सची लक्षणे कमी करण्यासाठीदेखील उपयुक्त आहे. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते, ज्याला एस्कॉर्बिक अॅसिडदेखील म्हणतात. हे एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे, जे अन्न लवकर पचण्यास मदत करते, ज्यामुळे अॅसिडिटीची समस्या टाळते. लिंबू पाण्याचे सेवन केल्याने अॅसिड रिफ्लक्समुळे होणाऱ्या पेशींच्या नुकसानापासून संरक्षण करण्यासाठी देखील मदत होते.

ही समस्या टाळण्यासाठी आणि अन्न सहज पचण्यासाठी, जेवण करण्यापूर्वी २० मिनिटे आधी लिंबू पाणी प्या, जेणेकरून ते प्यायल्याने अॅसिड रिफ्लक्सची लक्षणे टाळता येतील. यासमुळे तुमचे अन्न लवकर आणि व्यवस्थित पचते.

हे करण्यासाठी तुम्हाला एक ग्लास पाण्यात एक चमचा लिंबाचा रस, थोडासा आल्याचा रस आणि काळे मीठ मिसळावे लागेल. हे सर्व घटक तुमच्या पचनासाठी चांगले असतात.

# श्रीवर्धनमध्ये ढगाळ वातावरण व प्रचंड उष्मा; पर्यटकांकडून वातानुकूलित खोल्यांना मागणी



**श्रीवर्धन : बातमीदार**

सतत बदलत असलेले हवामान, कधी ऊन तर कधी ढगाळ वातावरण यामुळे उष्म्यामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. वास्तविक पाहता श्रीवर्धन मधील तापमान ३२ किंवा ३३ अंश सेल्सिअस इतकेच असते. परंतु हवेतील सापेक्ष आर्द्रता वाढल्यामुळे हे तापमान ३८ ते ४० सेल्सिअस असल्याचे जाणवते. प्रचंड उष्म्यामुळे या ठिकाणचे स्थानिक नागरिक हैराण झाले असून, घामाने अक्षरशः अंघोळ होत आहे.

तापमानात होत असलेल्या सततच्या बदलामुळे तापाच्या साथी देखील श्रीवर्धन तालुक्यात पसरलेल्या पाहायला मिळत आहेत. शासकीय रुग्णालयाशिवाय, खाजगी रुग्णालयांमध्ये व दवाखान्यांमध्ये देखील व्हायरल ताप येत असलेले अनेक रुग्ण आढळत असल्याचे पाहायला मिळत आहे. यामध्ये अनेकांना पेशी वाढणे, पेशी कमी होणे, डोके दुखणे, मळमळ होणे, अशा प्रकारचे त्रास जाणवत आहेत.

मे महिना म्हटला की शाळांना सुट्ट्या असतात. या काळामध्ये श्रीवर्धन सारख्या पर्यटकांच्या आवडीच्या ठिकाणी अनेक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. या ठिकाणी सर्वात जास्त पर्यटक पुणे जिल्ह्यातून व शहरातून येत असतात. मात्र मागील आठ दिवसांपासून येणाऱ्या पर्यटकांना ताम्हिणी घाट, माणगाव, मोरबा या परिसरात पाऊस पडताना दिसत आहे. श्रीवर्धन मध्ये फक्त एक दिवशी तुरळ प्रमाणात पाऊस झाला होता.

त्यानंतर वातावरण रोज ढगाळ होत असले तरी या ठिकाणी पाऊस पडलेला नाही. मात्र तुरळक झालेल्या पावसामुळे देखील आंबा बागायतदारांचे व वीट भट्टी मालकांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. माणगाव परिसरात पाऊस तर श्रीवर्धन परिसरात आल्यानंतर प्रचंड उष्मा जाणत असल्याने पर्यटकांकडून वातानुकूलित खोल्यांची मागणी सर्व हॉटेल मालकांकडे केली जात असल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र यावर्षी मौसमी पावसाचे आगमन लवकर होईल. असे जाणकारांमधून बोलले जात आहे. कारण मागील चार दिवसांपासून समुद्राचे पाणी देखील काही प्रमाणात खवळले असल्याचे पाहायला मिळत आहे.

# आमदार महानाट्य स्पर्धेत ‘उसन्या बायकोची, वरात लग्नाची’ प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**

कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था, अलिबाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आमदार महानाट्य स्पर्धा २०२५ मध्ये उसन्या बायकोची, वरात लग्नाची हे नाटक विजेते ठरले . वणवा नाटकाला द्वितीय क्रमांक मिळाला. दीप तुझ्या वंशाचा व आत्या आत या या नाटकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था, अलिबाग यांच्यातर्फे अलिबाग तालुक्यातील ग्रामीण नाट्य मंडळांसाठी आमदार महानाट्य स्पर्धा २०२५ दोन अंकी नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात ९ नाट्य मंडळ सहभागी झाली होती. ११ ते १५ मे या कलावधीत नाटकं सदर करण्यात आली. गुरुवारी (दि. १५) या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा भाग्यलक्ष्मी सभागृह, अलिबाग येथे झाला.

आमदार महेंद्र दळवी, सिने नाट्य अभिनेते भाऊ कदम, दिगंबर नाईक, बिग बॉसफेम अभिनेत्री जान्हवी किल्लेकर, स्पर्धेचे परीक्षक अभिनेते-दिग्दर्शक अनिल गवस व भरत सावले, भाजपा दक्षिण रायगडचे सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, युवा नेत्या अदिती दळवी, कामगार नेते दीपक रानवडे, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, सुरेश म्हात्रे, संजीवनी नाईक, तृप्ती पाटील, जान्हवी पाटील, संदीप गोठिवडेकर, ॲड. प्रसाद पाटील, डॉ. राजेंद्र चांदोरकर, डॉ. राजाराम हुलवान, आनंद कोळगावकर, रमेश धनावडे, वसुंधरा पोखरणकर, सुप्रिया जेधे व अर्चना कुंटे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या स्पर्धेत श्री हनुमान नाट्य मंडळ, भोनंग यांच्या उसन्या बायकोची, वरात लग्नाची हे नाटकने प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक श्री धावीर नाट्य मंडळ, नांगरवाडी यांच्या वणवा नाटकाने मिळवला. हनुमान नाट्य मंडळ, मेढेखार यांच्या दीप तुझ्या वंशाचा नाटकाला उत्तेजनार्थ प्रथम व मोरया क्रिएशन, चौलच्या आत्या... आत या नाटकाला उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक देण्यात आले. काशिनाथ झावरे याला उत्कृष्ट अभिनेता तर कीर्ती घासे हिला उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ट विनोदी अभिनेता म्हणून तुषार दिनकर पाटील याला, तर उत्कृष्ट बालकलाकार म्हणून रुद्र कडवे याला सन्मानित करण्यात आले.

रायगडमधील रंगभूमीची सेवा करणाऱ्या राजा अत्रे व विजया कुडव या ज्येष्ठ कलावंतांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कुमुदिनी नाईक व श्याम पुंडे यांना विशेष पुरस्काराने सन्मानित केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रतिम सुतार व तन्वी पाटील यांनी केले. प्रकल्प वाणी यांनी आभारप्रदर्शन केल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिमालय चोरघे, कीर्ती घासे यांनी परिश्रम घेतले.

सर्व नाट्य संस्थांना प्रकाश सप्रे, रणजीत घरत, रितेश घासे, ज्योती राऊळ, संदेश मयेकर, किरण साष्टे, मनीष अनसुरकर, संतोष बोंद्रे, सुधीर सावंत, सागर नार्वेकर, अमरदीप ठोंबरे, प्रतिम सुतार, प्रतीक पानकर, सचिन शिंदे, योगेश पवार व प्रकल्प वाणी यांनी मेंटॉर मार्गदर्शन केले.



# रोहा तालुका गुरव संघाच्या महिला अध्यक्षपदी मनोलु गुरव



**रोहे : प्रतिनिधी**

गुरव समाज रायगड, ठाणे, मुंबई संस्थेच्या माध्यमातून मंगळवारी रोहा तालुका गुरव समाज संवाद बैठक शासकीय विश्रामगृह रोहे येथे संपन्न झाली.या बैठकीला गुरव समाज रायगड ठाणे मुंबई संस्थेचे अध्यक्ष त्याच बरोबर राष्ट्रीय गुरव समाज महासंघ महाराष्ट्र उपाध्यक्ष श्री बंडू विरेश्वर खंडागळे हजर होते त्यांच्याबरोबरच रायगड जिल्हा अध्यक्ष अमोल गुरव, सचिन गुरव सर तसेच सोशल मीडिया प्रमुख हरेश खंडागळे व अनेक समाज बांधव उपस्थित होते. या बैठकीत महाराष्ट्र संस्थेच्या संघटनात्मक प्रमुख पदांची नियुक्ती पत्रक देण्यात आली.

यामध्ये राष्ट्रीय गुरव संघाच्या रोहा तालुका महिला अध्यक्षपदी रोह्यातील धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या मनोलु मनोज गुरव यांची निवड करण्यात आली ,यावेळी जाहीर करण्यात आलेली गुरव संघाची रोहा तालुका कार्यकारिणी सरचिटणीस -ममता गुरव ,उपाध्यक्षा -दीपिका गुरव ,मृणालीनी गुजर ,गीता गुरव ,खजिनदार -विशाखा निरव गुरव ,कार्याध्यक्षा -अनिता गुरव.

दक्षिण रायगड युवा कार्यकारिणी देखील यावेळी जाहीर करण्यात आली त्यामध्ये प्रमुखपदी राहुल गुरव,रोहा तालुका अध्यक्ष म्हणून प्रज्योत गुरव ,उपाध्यक्ष वैभव फुलारे ,सचिव निरव गुरव ,खजिनदार ओंकार गुरव ,कार्याध्यक्ष स्वप्निल गुरव ,सर चिटणीस म्हणून संकेत गुरव आदींची निवड करण्यात आली.

रोहा तालुका गुरव संघाच्या अध्यक्षपदी राहुल गुरव ,उपाध्यक्ष राकेश गुरव ,सचिव संकेत गुरव ,खजिनदार ओंकार गुरव ,कार्याध्यक्ष रूपेश गुरव ,सरचिटणीस सीद्धेश गुरव ,सदस्य म्हणून सनी गुरव ,जय गुरव ,भरत गुरव ,स्वप्निल गुरव ,प्रशांत गुरव ,नितीश गुरव आदींची निवड करण्यात आली.

या बैठकीचे पूर्ण नियोजन मनोलू मनोज गुरव. राहुल गुरव. संकेत गुरव. निरव गुरव व प्रज्योत गुरव यांनी केले. राष्ट्रगीतानंतर बैठकीची सांगता झाली.

मनोलु गुरव यांची गुरव संघाच्या रोहा तालुका महिला अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर व निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जे.एम. राठी इंग्लिश स्कूलची उज्वल निकालाची परंपरा

**रोहे : प्रतिनिधी**

जे.एम.राठी इंग्लिश स्कूल आणि ज्युनियर कॉलेज रोठखुर्द रोहाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातही सी.बी.एस.ई. बोर्ड इयत्ता दहावी व बारावी उज्वल निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे.

इयत्ता बारावी मध्ये विज्ञान शाखेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक कु.हंसाली गांधी ९२.६० टक्के, द्वितीय क्रमांक निधी लहाने ९१ टक्के, तृतीय क्रमांक कु. अथर्व पाटील ८४.४० टक्के, चौथा क्रमांक कु. गौतमी पाटील - ८२.२० टक्के, पाचवा क्रमांक आस्था कुमारी - ८०.४० टक्के हे विद्यार्थी गुण मिळवून यशस्वी झाले आहेत.

इयत्ता बारावी वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक कु. पूजा पाटील ९४.२० टक्के, द्वितीय क्रमांक कु. स्मरणिका कुशवाह ९२ टक्के, तृतीय क्रमांक कु. भावेश कुमावत ९०.६० टक्के, चतुर्थ क्रमांक कु. इब्राहिम नाडकर ८८.६० टक्के, पाचवा क्रमांक कु. श्रेया दिघे ८६.४० गुण मिळवून हे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक कु.वेदांत पवार ९६.२० टक्के, द्वितीय क्रमांक कु. रिषभ जैन ९३.८०, तृतीय क्रमांक कु.राजेश्वरी बनसोडे ९३ टक्के, क्रमांक कु.रोहित जुजागर ९३ टक्के, चौथा क्रमांक कु.वेदांत साळावकर ९२.२० टक्के पाचवा क्रमांक कु.स्वर कोलगे ९१.६० टक्के गुण मिळून विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

सी.बी.एस.ई बोर्डच्या इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांनी परीक्षेत अत्यंत उत्तुंग भरारी घेऊन यश संपादन केलेले आहे.त्याबद्दल शालेय व्यवस्थापन, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक वर्ग पालक यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढच्या आयुष्याच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्षपदी खा. धैर्यशील पाटील; कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**सुधागड : रामप्रहर वृत्त**



दक्षिण रायगड जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक आणि संघटनात्मक कार्यात मजबूत नेतृत्वाचा ठसा उमटवणारे राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांची पुन्हा एकदा भाजप जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

धैर्यशील पाटील यांनी पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी निस्वार्थपणे मेहनत घेतली असून, पक्ष मजबूत करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या सामाजिक तसेच राजकीय योगदानामुळे दक्षिण रायगडमधील अनेक विकासात्मक उपक्रमांना वेग मिळाला, तसेच ग्रामीण भागातील समस्या सोडवण्यासाठी प्रभावी निर्णय घेतले.

धैर्यशील पाटील यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांसोबत सातत्याने संवाद साधत, नव्या नेतृत्वाला संधी देत आणि समाजहिताच्या धोरणांना प्राधान्य देत पुढे वाटचाल केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण रायगडमध्ये अनेक उपक्रम, विकास योजना आणि सामाजिक कार्यांचे प्रभावी नियोजन करण्यात आले. त्यांनी राजकीय पारदर्शकता आणि सामाजिक बांधिलकीच्या तत्वावर प्रशासनाचा उपयोग करत जनतेशी निकट संबंध वाढवले.

त्यांच्या पुनर्नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आणि जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली भविष्यातील राजकीय आणि विकासात्मक धोरणांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पक्षाच्या गृहितकांप्रमाणे त्यांनी केवळ राजकीय कार्यच नव्हे, तर सामाजिक कल्याणासाठीही प्रखर भूमिका बजावली आहे.

दक्षिण रायगडमधील विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांकडून त्यांचे अभिनंदन होत असून, पुढील कार्यकाळातही संघटनात्मक आणि विकासात्मक दृष्टिकोन कायम ठेवत जनतेच्या विश्वासाला त्यांनी उत्तर देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


मा.साळवी साहेब
अर्जदारांचे वकिल ॲड. नित्यानंद राम ठाकूर
मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल जि. रायगड.

**जाहिर नोटीस**

दिवाणी ची अर्ज ४४७/२०२५
पु.ता. २१/०६/२०२५
नि.०७/ड

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर साहेव यांचे न्यायालयात**

१. श्री नरेश रामदास ठाकुर
वय :५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२. श्री. सदानंद रामदास ठाकुर
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : मासेमारी
३. श्री. दिनेश रामदास ठाकुर
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : धंदा
वरील १ ते ४ रा. मु. कोपर पो. गव्हाण
ता. पनवेल जि. रायगड पिन नं. ४१०२०६.
४. रंजना रामदास ठाकुर उर्फ सौ. रंजना दिपक पाटील
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गृहीणी
मु. उलवे, पो. उलवे ता. पनवेल जि. रायगड पिन नं. ४१०२०६.
५. श्री. विलास रामदास ठाकुर
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : धंदा
६. श्री. नामदेव रामदास ठाकुर
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : मासेमारी
वरील ६ ते ७ रा. मु. कोपर पो गव्हाण ता. पनवेल
जि. रायगड. पिन नं. ४१०२०६.
**अर्जदार**

विरुध्द

कुणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांना या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की सदरहु अर्जदार वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल करत आहेत. अर्जदार नं.१ ते ६ यांचे वडील **कै. रामदास सावळाराम ठाकुर हे २६.०१.२०२४ रोजी** मु. कोपर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे कै रामदास सावळाराम ठाकुर यांचे वारस आहेत.

मयत **कै. रामदास सावळाराम ठाकुर** यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकत नं. १ मौजे न्हावे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| युनिट केस नं | सर्वे नं हिस्सा नं | हे. क्षेत्र लागवडी लायक | हे. क्षेत्र पोट खरावा | हे. क्षेत्र एकुण | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ/७७३ | ०.३४.१ | ०.००.३ | ०.३४.४ | २.३७ |
| | अ/७९३ | १.१३.० | ०.०१.० | १.१४.० | ५.८१ |
| | अ/७९० | ०.३१.१ | ०.००.३ | ०.३१.४ | २.१९ |
| | एकुण | १.७८.२ | ०.०१.६ | १.७९.८ | १०.३७ |

सबब मिळकतीबाबत **कै. रामदास सावळाराम ठाकुर** यांचे कायदेशिर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे. कोर्टात दाखल कराव्यात मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल यांची नोंद घ्यावी.

आज ता.१५.०५.२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, पनवेल**




**मुरुड : उन्हाळी सुट्टीत समुद्रकिनारी पर्यटक वाढले असून समुद्राच्या लाटांशी खेळण्याचा, डुंबण्याचा व किनारी भटकंती करण्याचा आनंद घेताना ते दिसत आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# नवी मुंबईत ड्रोन कॅमेऱ्यांना बंदी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत ड्रोन बंदी आदेश देण्यात आले आहेत. सागरी किनाऱ्यावर हे आदेश कायम असतात. मात्र पहलगाम येथील हल्ल्यानंतरची परिस्थिती पाहता सुरक्षा म्हणून ही बंदी आयुक्तालय क्षेत्रात घालण्यात आली आहे. या आदेशाचे काटेकोर पणे पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पहलगाम येथे झालेला अतिरेकी हल्ला आणि त्याला भारताने सडेतोड उत्तर दिल्यानंतर दोन्ही देशांदरम्यान शस्त्रविराम आहे. मात्र सुरक्षाविषयक सतर्कता बाळगली जात आहे. आजच्या सॅटेलाईट तंत्रज्ञान काळात असे हल्ले करण्यास ड्रोनचा वापर केला जाऊ शकतो त्यामुळे ठाणेपाठोपाठ नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ड्रोन कॅमेराला बंदी घालण्यात आली आहे.



महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा असून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ११० किलोमीटर सागरी किनारा आहे. यात ऐरोली ते वाशी-करावे एनआरआय, खारघर उरण ते घारापुरी लेणी हा परिसर नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतो. या क्षेत्रात ड्रोन कॅमेरा बंदी कायम असते, मात्र पहलगाम हल्ल्यानंतर पूर्ण पोलीस आयुक्तालंय क्षेत्रात ड्रोन कॅमेराला बंदी घालण्यात आली आहे.

> **काही अघटित घडू नये म्हणून ड्रोन बंदी घालण्यात आली आहे. खासगी समारंभ वा हौस म्हणून ड्रोन कॅमेराचा वापर केला जातो, मात्र त्यामुळे भीती आणि पाठोपाठ अफ़वा पसरून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. त्यामुळे ही बंदी घालण्यात येते. कोणी या आदेशाचे उलंघन केले तर कायाद्यानुसार गुन्हा नोंद करून कारवाई होईल.**
>
> **- इंद्रजित करले, सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा**

# कचरा वेचक महिलांच्या मुलांसाठी नेतृत्वगुण कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्त्री मुक्ती संघटनेच्या माध्यमातून नवी मुंबईत १००० कचरावेचक महिलांचे संघटन केले असून मुलांनी आईसारखे कचऱ्यावर ना जाता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे म्हणून सातत्याने प्रयत्न केले जातात. नवी मुंबईतील आठ वस्ती मधून अभ्यास वर्ग चालू असून ३९० मुले या माध्यमातून शिकत आहेत .असे स्त्री मुक्ती संघटनेच्या विश्वस्त वृषाली मगदूम यांनी सांगितले .या विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी लागली असून सुट्टीतील उपक्रमाचा एक भाग म्हणून कळवा, दिघा ,रबाळे, इंदिरानगर, बोनसरी ,पनवेल या अभ्यास वर्गातील १४ ते १८ वयोगटातील ७० मुलांसाठी दिवसभराच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

'फौजी की पाठशाला' या कार्यशाळेत मुलांसाठी लीडरशिप या विषयावर सदर कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये कॅप्टन तनुजा काबरे व तिचे सहाय्यक श्रावणी बाळेकर व रोहित यांनी विद्यार्थ्यांना विविध खेळाच्या माध्यमातून नेतृत्व गुण कसे जोपासावे, हे सकारात्मक पद्धतीने सांगितले. टीम बिल्डिंगमध्ये विद्यार्थ्यांनी एकमेकांशी आदराने वागणे, संवाद करणे ,दुसऱ्याचे लक्षपूर्वक ऐकणे न घाबरता आपले मत मांडणे हे विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले, प्रथमोपचार या सत्रामध्ये अपघात झालेल्या लोकांना वाचवण्यासाठी काय करता येईल याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले ,रक्त थांबवणे, पाय फ्रॅक्चर झाला असेल तर स्ट्रेचर बनवणे याचे प्रात्यक्षिक घेतले गेले.ॲम्ब्युलन्स उशिरा पोहोचते ,डॉक्टरी उशिरा येतात, तोपर्यंत विद्यार्थी व्यक्तीला मदत करून कसे वाचवू शकतो हे सांगण्यात आले.





शेवटच्या सत्रात कठीण परिस्थितीवर न डगमगता मात करण्यासाठी काय करता येईल हे सांगण्यात आले, स्वतःचाच फायदा न बघता इतरांनाही कसे पुढे घेऊन जाता येईल ,संघटित करता येईल, एकमेकांचे कौतुक करणे ,आनंद वाटून घेणे हे सर्व गप्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या पर्यंत पोहोचवण्यात आले.

या विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण दिसलेल्या काही विद्यार्थ्यांना दूरदर्शन निवेदिका डॉ. मृण्मयी भजक हिच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली, डॉ मृण्मयी यांनी समारोपात विद्यार्थ्यांनी चिकाटी व सातत्य ठेवून आपला सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत व यशाचे शिखर गाठले पाहिजे असे सांगितले.



**पनवेल : महाराष्ट्र स्टेट बोर्डाने घेतलेल्या दहावीच्या परीक्षेत ९२% गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल ओवळे येथील सीकेटी विद्यालयातील विद्यार्थिनी मनस्वी शैलेश गायकवाड हिचा सन्मान करताना तिचे आई-वडील, साप्ताहिक माझं पनवेलचे संपादक विशाल सावंत, गोविंद शेळके, दामू भगत, जनार्दन पवार, ललित कडव आणि एस.पी. इन्फ्रा ग्रुपचे सदस्य.**

## संभाजी महाराज जयंतीदिनी अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

छत्रपती संभाजी महाराज जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयात म्फिथिएटर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर तसेच अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नमुंमपा इटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण केंद्राचा १००% निकाल

**नवी मुंबई : बातमीदार**

दरवर्षीप्रमाणेच यावर्षीही नवी मुंबई महानगरपालिकेच्या इटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्रामधील कर्णबधीर, अंध, अध्ययन अक्षम, मतिमंद व बहुअपंगत्व अशा सर्व विभागांतील दहावीची परीक्षा देणाऱ्या विशेष मुलांनी आपली १००% निकालाची परंपरा कायम ठेवत घवघवीत यश मिळवले आहे व दिव्यांगत्व असले तरी शैक्षणिक प्रगतीत आपण कमी नसल्याचे दाखवून दिले आहे. या यशस्वी मुलांचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विशेष कौतुक केले आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इटीसी केंद्रातील एकूण १९ विशेष मुले दहावी शालांत परीक्षेस बसले होते. ते सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये मतिमंद विभागातून कु. कल्याणी अवटे हिने ८५ % संपादन करीत सर्वाधिक गुण प्राप्त केले आहेत. तिच्यासह मतिमंद विभागातून एकूण १४ विशेष मुलांनी सुयश प्राप्त केले आहे. त्यापैकी विनायक पाटील व रिया शिंदे या दोघांना पालक मार्गदर्शनाद्वारे इटीसी केंद्रातून मदत देण्यात आली होती. या व्यतिरिक्त मतिमंद विभागातूनउत्तीर्ण होणा-या विशेष मुलांमध्ये मंथन थोरात, द्रोण मढवी, अब्दुल खान, तेजस शेट्टी, विश्लेष कुवर, मंदार रणदिवे, तन्मय़ कळंबे, आयुष घाडगे, विनायक चव्हाण, स्वरा पाडळे, ईश्वरी दांडगे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. कर्णबधीर विभागातून मारीया नागलेकर हिने ७७.६०% गुण प्राप्त केले आहेत. तर अध्ययन अक्षमता विभागातून निषाद दवे याने सुयश प्राप्त केले आहे. अंध विभागातून सूरज भोसले याने दररोज इटीसी केंद्रात दररोज उपस्थित राहत तर श्रावणी बोरे हिने पालक मार्गदर्शनाद्वारे यश संपादन केले आहे. बहुविकलांग विभागातून सोहम पाटील याने यश प्राप्त केले आहे.

या मुलांमध्ये काही मुले ही इंग्रजी माध्यमातून तर काहींनी मराठी माध्यमातून हे यश मिळवले आहे. तसेच मुलांनी शैक्षणिक अभ्यासासोबत इतर अभ्यासेतर उपक्रमातही उत्साहाने सहभाग घेतला होता.

# सजग नागरिक मंचच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर रेल्वेस्टेशन आणि अर्बन हट याच्या दरम्यान असणाऱ्या सर्व्हिस रोडची दुरावस्था लक्षात घेत सदरील रोडचे नव्याने डांबरीकरण करून सिडकोने रेल्वे प्रवाशांना द्यावा याबाबतची आग्रही मागणी सजग नागरिक मंच नवी मुंबईच्या वतीने डिसेंबर २०२४ मध्ये सिडको प्रशासनाकडे केली होती व त्याच्या पूर्ततेसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केलेला होता . सदरील रोडचे डांबरीकरणाचे काम १५ मे रोजी पूर्णत्वास गेले आहे .

रेल्वेट्रॅक ओलांडून होणारे अपघात टाळण्यासाठी रेल्वेप्रशासनाने प्लॅटफॉर्मच्या दोन्ही बाजुंना ग्रील लावण्याचा स्तुत्य उपक्रम राबविलेला असल्याने आग्रोळी , आयकर कॉलनी व सेक्टर ३० बेलापूर येथील रेल्वे प्रवाशांना वर्षानुवर्षे दुरावस्थेत असणाऱ्या रस्त्याचा वापर करून रेल्वे तिकीट खिडकीकडे व प्लॅटफॉर्मकडे जाण्याचा एकमेव मार्ग उरलेला होता. नवी मुंबई महानगरपालिका



अन्य ठिकाणी स्वच्छतेचा डांगोरा पिटवून 'पहिला नंबर 'प्राप्तीचे स्वप्न बाळगत असले तरी रस्ता सिडकोचा की पालिकेच्या वादात सदरील रस्त्यावर घाणीचे, खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याची तक्रार केल्यानंतर तातडीने साफसफाई करण्यात येत होती.

पुन्हा 'येरे माझ्या मागल्या ' अशा प्रकारे सदरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले होत असे . रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करण्यात आल्याने प्रवाशांची खड्डेयुक्त रस्त्यातून सुटका होणार असल्याने सजग नागरिक मंचाचे सदस्य प्रदीप कशाळकर यांनी समाधान व्यक्त केलेले आहे. सदरील रस्त्याच्या बाजूला अर्बन हटची भिंत असून सदरील भिंतीला ठिकठिकाणी तडे गेलेले असल्याने पावसाळ्यात दगड -माती रस्त्यावर येण्याची शक्यता ध्यानात घेत सिडकोने त्या बाबतीत योग्य ती उपाययोजना करावी व रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या गटाराची स्वच्छता करावी अशी मागणी मंचाचे सदस्य व भीमराव जामखंडीकर यांनी केलेली आहे .

> **जनतेच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत सिडको प्रशासनाने रस्त्याचे डांबरीकरण करत रेल्वे प्रवाशांना पावसाळ्यापूर्वी चांगली भेट दिली यासाठी सिडकोचे सजग नागरिक मंचाच्या वतीने आभार मानतो.**
>
> **-अरुण कागले उपाध्यक्ष , सजग नागरिक मंच नवी मुंबई**

# दिवाळे कोळीवाडा शाळेचा ९४ टक्के निकाल



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल मंगळवार ( ता.१३ ) रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला. यावेळी, जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालानुसार नवी मुंबई महानगरपालिका संचलित माध्यमिक विद्यालय दिवाळे कोळीवाडा, शाळा क्रमांक ११७ या शाळेच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेचा निकाल ९४ % लागला असून आपल्या सर्वांगीण यशाची परंपरा कायम राखली आहे. यावेळी, संपूर्ण पंचक्रोशीतून या शाळेचं कौतुक होत आहे.

दरम्यान, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधून दहावीच्या विध्यार्थ्यांनी शाळांत परीक्षा दिली होती. या परीक्षेत नमुमपा माध्यमिक २३ शाळांतील २६९८ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी २५६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, नमुमपा शाळांचा एकूण निकाल ९४.७२ टक्के एवढा लागला आहे.

जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालानुसार या शाळा क्रमांक ११७ शाळेतून कु. शितल केशव जाधव हिने ( ८५.६० % ) मिळवून शाळेत प्रथम आली असून,कु.योशिता बाळकृष्ण कोळी ( ८५.२० % ) द्वितीय तर कु. ईशा रंजीत मोरे हिने (८३.८० % ) गुण मुळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. यावेळी, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल विद्यार्थ्यांसह शाळेतील शिक्षकांचं देखील पालकांनी अभिनंदन करून आनंद व्यक्त केला आहे.



# तांबडी घटनेचा निकाल दुर्दैवी

## हायकोर्टात जाण्याची तयारी -खा. तटकरे



**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

तांबडी येथील प्रकरणात पोलीस यंत्रणा पूर्णपणे कामाला लागली होती. चांगला तपास केला होता. सरकारी वकील उज्वल निकम यांनी ही केस चांगल्या पद्धतीने लढवली होती, मात्र न्यायालयाचा निकाल हा विरोधात गेला आहे. हा निकाल दुर्दैवी, अन्यायकारक व संतापजनक असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

या वेळी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, सरपंच रामाशेठ म्हात्रे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उघडे, महेंद्र गुजर आदी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे व मी स्वतः उज्वल निकम यांच्या सातत्याने संपर्कात होतो. चांगला युक्तिवाद त्यांनी केला, पण हा निकाल दुर्दैवी लागला. या निकालाच्या विरोधात आम्ही उच्च न्यायालयात जाणार आहोत. मंत्री आदिती तटकरे या स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची भेट घेत याविषयी सविस्तरपणे चर्चा केली आहे. मीही या संबंधित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली आहे. सरकारच्या वतीने उच्च न्यायालयात जाण्यात येणार असून स्वतः उज्वल निकम या केससंदर्भात काम करत आहेत. राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाच्या सूचनानुसार उच्च न्यायालयात जाण्याची प्रक्रिया चालू केली असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी या वेळी सांगितले व आरोपींना कठोरात कठोर शिक्षा कशी होईल हे पाहणार असल्याचे म्हटले.

## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवासाठी रायगडातील मंडळी गोव्याकडे रवाना

**नागोठणे : बातमीदार**

सकल मानवजातीच्या परमकल्याणासाठी तसेच रामराज्याच्या स्थापनेसाठी कार्यरत सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने गोवा फोंडा येथे १७ ते १९ मे या कालावधीत सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. फोंड्यातील फार्मागुडी येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होत आहे.

या महोत्सवासाठी रायगड या जिल्ह्यातून सनातन संस्थेचे शेकडो साधक, हिंदू धर्मप्रेमी आणि हिंदुत्वनिष्ठ यांनी सनातन राष्ट्राचा जयघोष करत वाहने, बस, रेल्वे आणि विमानातून एकूण ७००हून अधिक जणांनी गोव्याकडे प्रयाण केले.

या वेळी हिंदुत्वनिष्ठांनी भगव्या टोप्या परिधान केल्या होत्या तसेच वाहनांवर लावलेल्या भगव्या ध्वजांमुळे वातावरणात चैतन्य पसरले असल्याची माहिती सनातन संस्थेचे श्रीकृष्ण उपाध्ये यांनी दिली.

# ना. आदिती तटकरेंच्या हस्ते रोहा अष्टमी पालिका हद्दीतील विविध कामांचे भूमिपूजन



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील विविध कामांचे भूमिपूजन महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गुरुवारी सायंकाळी करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, माजी गटनेते महेंद्र गुजर, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलटकर, अहमद दर्जी, जितेंद्र पडवळ, समीर सकपाळ, मयूर दिवेकर, प्राजक्ता चव्हाण, नितीन पिंपळे, अॅड. हर्षद साळवी समाधान शिंदे, वसंत कोठारी, रवी चाळके, रूपेश पाटील, महेश नागावकर, संतोष कडव, सागर बोबड, निलेश शिर्के आदी उपस्थित होते.

या वेळी रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या हद्दीत विविध कामांच्या करण्यात आलेल्या भूमिपूजनामध्ये रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील पाटणकर यांचे घर ते एमआयडीसी बायपास ते नदीपर्यंतच्या नाल्यावर गटार बांधणे, रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील रायकर पार्क ते एमआयडीसी बायपासपर्यंत रस्ता करणे, रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील रायकर पार्क मीना अपाटमेंट ते संत गोरोबा नगर दमखाडीपर्यंत रस्ता करणे, रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील अष्टमी बौध्दवाडा ते रोहा रेल्वेस्थानकापर्यंत रस्ता विकसित करणे, रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील म्हाडा कॉलनीमधील मुख्य रस्ता करणे, एचपीसीएल सीएसआर वर्क निधी अंतर्गत नगर परिषदेच्या शाळांचे दुरुस्ती व नूतनीकरण ( डॉ. सी. देशमुख माध्यमिक शाळा, छत्रपती शिवाजी नगर, रोहा) या कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाची तयारी पूर्ण

**नागोठणे : बातमीदार**

जसे कुंभमेळ्याला लाखो भाविक, संत-महंत एकत्र येतात, तसेच पहिल्यांदाच गोव्याच्या पावन भूमीवर १७ ते १९ मे कालावधीत एक दिव्य आध्यात्मिक कुंभमेळा भरतो आहे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव!

या महोत्सवात २३ देशांतील नागरिक आणि संत-महंत, धर्मप्रेमी हिंदू, तसेच २५ हजारांहून अधिक भाविक ४ ते ५ दिवस वास्तव्य करणार असून संतांच्या वाणीची ज्ञानगंगा, एक कोटी रामनाम जपयज्ञ, शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, विविध संतांच्या पावन पादुका, एक हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दुर्मिळ दर्शन आणि महाधन्वंतरी ते शतचंडी यज्ञयाग या उपक्रमांचा समावेशही आहे. महोत्सवाची सर्व तयारी पूर्ण होत आली असून लवकरच सर्वांना भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम गोव्यात पहायला मिळणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक यांनी दिली. ते फर्मागुडी, फोंडा, गोवा येथील अभियांत्रिकी मैदानावर आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

या वेळी महोत्सवाची सिद्धता पाहिल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेला उद्योजक जयंत मिरिंगकर, गोमंतक मंदिर महासंघाचे सचिव जयेश थळी, हिंदु जनजागृती समितीचे गोवा राज्य संघटक सत्यविजय नाईक व सुचेंद्र अग्नी उपस्थित होते.

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे क्षेत्रफळ एक लाख २६ हजार चौरस मीटर क्षेत्रामध्ये पसरलेले असून त्यात २५ हजार लोकांना बसण्यासाठी वातानुकुलित मंडपव्यवस्था करण्यात आली आहे. एकावेळी आठ हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था, हजारो वाहनांसाठी १७ पार्किंग झोन, भाविकांसाठी ३५० प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासह भव्य धार्मिक ग्रंथ विक्री केंद्र, गो-कक्ष, श्रीअन्नपूर्णा कक्ष, गुरुमंदिर, सहा हजार चौरस फूटाचे शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, १५ संतांच्या पावन पादुका कक्ष, एक हजार वर्षांपूर्वीचे सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन कक्ष असेल; तसेच महोत्सवात सुरक्षेसाठी पोलीस मनोरे, सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक, अनेक रुग्णवाहिका, बाईक अॅम्बुलन्स; अग्निशमन दलाच्या गाड्या, वैद्यकीय केंद्रात १६ डॉक्टर्स, सुव्यवस्थापनासाठी प्रशासनाच्या २५ विभागांसाठी जागा, माध्यम प्रतिनिधींसाठी कक्ष तसेच अन्य आवश्यक त्या सुविधा असणार आहेत.

या महोत्सवात सुरक्षेच्या कारणास्तव सर्वांना प्रवेशासाठी शासनमान्य ओळखपत्र आणणे आवश्यक आहे तसेच येताना बॅगा आणू नयेत, अशी विनंती सनातन संस्थेकडून करण्यात आली आहे.

# पालीच्या जान्हवी काळेची 'सुवर्ण'भरारी; मुलींमध्ये अव्वल

**कळंबोली : बातमीदार**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टाचे चीज पालीतील ग.बा. वडेर हायस्कूलमधील जान्हवी सुनील काळे या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून दाखवली आहे. तिने दहावीच्या परीक्षेत ९४% गुण प्राप्त करून विद्यालयात मुलींमध्ये प्रथम क्रमांक आणि विद्यालयात दुसरा क्रमांक मिळवण्याचा बहुमान पटकावला.



आपल्या लेकीने आमच्या कष्टाचे चीज सोन्यात रूपांतर करून आमच्या कुटुंबियांचे नाव उंचावून आम्हाला सुखद धक्का दिल्याचे भावनिक मत जान्हवीचे वडील सुनील काळे यांनी बोलताना सांगितले.

दहावीच्या परीक्षेच्या निकालात पालीतील ग.बा. वडेर हायस्कूलमध्ये दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या जान्हवी सुनील काळे या विद्यार्थिनीने मुलींमध्ये चांगले गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळून विद्यालयाचे, तालुक्याचे आणि कुटुंबियांचे नाव उंचावून शैक्षणिक भरारी घेतलेली आहे.

जान्हवीचे वडील हे एसटी महामंडळात मेकॅनिक म्हणून नोकरी करीत होते, तर तिची आई ही गृहिणी आहे. त्यांनी आपल्या मुलीच्या पंखात बळ देऊन शिक्षण भरारी घेण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

तशी जान्हवीच्या घरची प्रतिकूल परिस्थिती. या परिस्थितीची जाणीव जान्हवी काळे हिला असल्याने तिने अभ्यासात तितकीच चुणूक दाखवून दहावीच्या परीक्षेत ९४ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात दुसरा क्रमांक व मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवण्याचा बहुमान पटकावला आहे. तिच्या या यशाने काळे कुटुंबीयांच्या आनंद गगनात मावेनासा झालेला आहे.

या गुणवंत जान्हवीचे व तिच्या आई-वडिलांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वर्गातून अभिनंदन केले जात आहे. पाली गावात चणे फुटाणे विकून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणाऱ्या काळे कुटुंबियांमध्ये जान्हवी काळे हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून एक प्रकारे सावित्रीची लेकच जन्माला आल्याने आई-वडिलांची कुटुंबीयांचे व शाळेची मान गौरवाने उंचावली आहे. तिच्या कुटुंबीयांनी शैक्षणिक प्रगतीसाठी अपार मेहनत घेऊन पाठबळ दिले आहे.

## संस्कार धाम शाळेचे माध्यमिक शालांत परीक्षेत यश

**महाड : प्रतिनिधी**

संस्कार धाम विद्यालय मराठी माध्यमाने दहावीत घवघवीत यश मिळवले आहे. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन पुन्हा एकदा विद्यालयाची १००% निकालाची परंपरा अखंड सुरू राहिली आहे.

विद्यालयातील श्रद्धा सतीश देशमुख ९७% गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे, तर महाड तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवून विद्यालयाच्या प्रगतीत मानाचा तुरा खोवला आहे. पूजा हरिश्चंद्र गायकवाड हिने ९६.२०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक, तर श्रेया सतीश देशमुख हिने ९५.२०% गुण मिळवून आपली तृतीय क्रमांकाची छाप पाडली आहे. ९०%च्या वर गुण मिळवणाऱ्या अन्य विद्यार्थी प्रामुख्याने दिप्ती रामदास तळवटकर ९२.६०%, भक्ती अनंत चौधरी ९२.४०%, तनुजा अजित कालगुडे ९२.२०% असे आहेत.

एकूण विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळून यशस्वी झाले आहेत. प्रथम श्रेणीत १४ व द्वितीय श्रेणीत चार विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल मुख्याध्यापिका भारती भरत कदम तसेच रमेश ढेपे, नैना परब, दिलीप सकपाळ यांचे या टीमचे, पालकवर्ग यांचे सहकार्य आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा व शिक्षकवर्गाचा बाल विद्यार्थी व युवक सुधार संस्थेचे अध्यक्ष नथुराम निंबरे, इतर पदाधिकाऱ्यांनी कौतुक केले.

# खरीपपूर्व मशागतीसाठी शेतकऱ्यांची लगबग

**माणगाव : प्रतिनिधी**



मे महिन्याच्या पंधरवड्यापासूनच रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हालचालींना वेग आला आहे. आकाशात जमलेले ढग, वाढती आर्द्रता आणि हवामान खात्याच्या अंदाजाने शेतकऱ्यांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीची लगबग सुरू झाली आहे.

विशेषतः रायगड, कोकण व घाटमाथ्याच्या भागात शेतकरी मशागतीच्या कामात गुंतले आहेत. भारतीय कृषी पद्धतीत रब्बी आणि खरीप हे दोन महत्त्वाचे हंगाम आहेत, परंतु गेल्या काही वर्षांपासून हवामानातील अनिश्चिततेमुळे या दोन्ही हंगामांत समतोल राखणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. विशेषतः माणगाव तालुक्यात कालव्याच्या पाण्यावरील रब्बी हंगामातील भाताचे पीक अजूनही शिवारातील शेतात उभे असताना खरीपपूर्व तयारीचा ताण वाढल्याने शेतकरी पुरता संकटात सापडला आहे.

रब्बी भाताचे पीक मार्च-एप्रिलमध्ये तयार होते, पण त्या वेळी उन्हाळ्याची तीव्रता, पाण्याची कमतरता आणि मजुरांची टंचाई या गोष्टी पीक काढणीला विलंब घडवतात. दुसरीकडे खरीप हंगामासाठी मेपासूनच जमिनीची नांगरणी, खते व बियाण्यांची व्यवस्था, पाण्याचा स्रोत निश्चित करणे आदी कामे सुरू करावी लागतात. अशा स्थितीत एकाच वेळी दोन हंगामांची जबाबदारी पार पाडणे म्हणजे आर्थिक व मानसिक ताण निर्माण करणारी गोष्ट ठरते. याशिवाय रब्बी पीक वेळेवर न काढल्यास पुढील हंगामासाठी लागणारी शेतीची मशागत होऊ शकत नाही. परिणामी खरीप पीक वेळेवर लावता येत नाही. याचा थेट परिणाम उत्पादनावर आणि उत्पन्नावर होतो. यंदा अंदमान-निकोबार बेटांमध्ये मान्सूनचे आगमन वेळेआधी होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. हे संकेत पुढील आठवड्यात केरळात आणि नंतर कोकण, विशेषतः रायगड जिल्ह्यात पावसाची सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नांगरणी, पाण्याच्या साठ्यांची तयारी व बियाणे खरेदी आदी कामांना वेग दिला आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाचा असतो. भात, नागली, वरी आणि इतर पिकांच्या लागवडीसाठी मान्सूनच्या पहिल्या पावसाची आतुरतेने वाट पाहिली जाते.

रायगड जिल्ह्यात विशेषतः भातशेती हे प्रमुख अन्न असल्याने शेतकरी ढवळ, शेतसिंचन आणि सेंद्रिय खतांचा पुरवठा यावर भर देताना दिसत आहेत. दुसरीकडे, हवामान खात्याचे अंदाज हे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत असून राज्य सरकार आणि कृषी विभाग यांच्याकडून पीकविमा, बी-बियाण्यांचे वाटप आणि तांत्रिक मार्गदर्शन दिले जात आहे. काही भागांत कृषी महोत्सवाचे आयोजन करून आधुनिक शेतीच्या पद्धतींबाबत जागरूकता वाढवली जात आहे, मात्र अनियमित हवामान, चक्रीवादळांची शक्यता आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेतकऱ्यांमध्ये काहीशी अस्वस्थता आहे. तरीही नैसर्गिक लहरींना सामोरे जात शेतकरी पुन्हा एकदा नव्या आशेने, श्रमाने आणि चिकाटीने खरीप हंगामाच्या दिशेने वाटचाल करत आहे. अंदमानात लवकरच मान्सून दाखल होणार असल्याने आणि केरळ व रायगडमध्ये पावसाची चाहूल लागल्याने शेतकऱ्यांच्या हालचालींना गती मिळाली आहे. निसर्गावर विश्वास ठेवत शेतकरी मशागतीची कामं करत असून या वर्षी चांगल्या पावसाची आणि भरघोस उत्पादनाची अपेक्षा प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे.

माणगाव तालुक्यात गेल्या पाच वर्षांपासून भात शेतीचे क्षेत्र दिवसेंदिवस घटत आहे. वाढते औद्योगीकरण जमिनीचे हस्तांतरण विक्री तसेच बिनशेतीचे प्रकार यासह निसर्गाच्या लहरीमुळे शेती करणे परवडत नाही त्यातच मजुरांचा अभाव आणि महागडे बी बियाणे यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले आहे. शासन वेळोवेळी या शेतीच्या उत्पादनासाठी वेगवेगळे उपक्रम तसेच शेतकऱ्यांना मार्गदर्शन, प्रात्यक्षिक यासह विविध मार्गदर्शन करीत आहे.

तालुक्यात गेल्या पाच वर्षांमध्ये खरीप हंगामातील भात पिकाचे क्षेत्र २१०० हेक्टर होते. गेल्या दोन वर्षांपासून ते १२०० हेक्टरवर आले आहे. उन्हाळी रब्बी हंगामातील भात पिकाचे क्षेत्र ३८ हेक्टरवर आले आहे.

# नांदगावमध्ये समाधान शिबिराला प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील नांदगाव मंडळ अंतर्गत येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरात स्थानिक जनतेची अनेक कामे मार्गी लावण्यात आली.



सहा रेशन कार्डबाबत कागदपत्रे जमा करण्यात आली, १६ उत्पन्न दाखल्यांची चौकशी, नऊ उत्पन्न दाखले वाटप, चार वारस नोंदी चौकशी कागदपत्रे जमा, १० आधारकार्ड अपडेट, एक ग्रीस्टॅक नोंदणी (सर्वर प्रॉब्लेममुळे अन्य नोंदी झाल्या नाहीत), पीएम किसान योजना, लक्ष्मी मुक्ती योजना अशा, अ पा क, ३२ ग /३२ म बोजा कमी करणे, १५५ दुरुस्ती आदेश, जिवंत ७/१२ मोहीम, तगाई बोजा, संगायो, पुरवठाबाबत योजना, अॅग्रीस्टॅक, पाणंद रस्ते (नैसर्गिक आपत्ती), इ.बाबत माहिती मंडळ निरीक्षक नारायण गोयजी यांनी दिली.

या वेळी नांदगाव सजाचे तलाठी अरविंद देशमुख, मजगाव व उसरोली, विहुर संघाचे तलाठी, नांदगाव सरपंच सेजल घुमकर, विहुरच्या मुसर्रत उलडे, माजी उपसरपंच अस्लम हलडे, यशवंत पाटील, सुदेश घुमकर, ज्ञानेश्वर फलेभाई, सचिन करंदेकर आदी उपस्थित होते. शिबिराला लाभार्थ्यांची मोठी गर्दी झाली होती. त्यांनी समाधान व्यक्त केले.

## रांगोळीकार अनिरूद्ध खेडेकर यांनी रेखाटली बोलकी रांगोळी

**मुरूड : प्रतिनिधी**

नांदगाव येथील प्रसिध्द पुरोहित कै. केशव रंगनाथ जोशी यांचा नातू आणि विनोद जोशी यांचे पुत्र ऋग्वेद जोशी याची मुंज होती. लहान वयात मुंज पार पाडली जात असताना मुलाच्या चेहऱ्यावर उमटलेले हावभाव प्रसिद्ध रांगोळीकार अनिरुद्ध खेडेकर यांनी आपल्या रांगोळीतून साकारून अत्यंत बोलकी रांगोळी काढून सर्वांची मने जिंकली.

शुभकार्य म्हटले की रांगोळी आलीच आणि रांगोळी आली म्हणजे कार्याची शोभा वाढलीच! मुंजीच्या कार्यक्रमास असंख्य नातेवाईक व हितसंबंधमधील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होत असतात.

ऋग्वेद जोशी याचा व्रतबंध विधी सोहळा हल्लीच पार पडला. या शुभकार्याविळी नांदगाव येथे रांगोळीकार



अनिरुद्ध खेडेकर यांनी त्याच्या निरागस चेहऱ्यावरील हाव भाव अचूक टिपून एक सुंदर रांगोळी काढल्याने सर्वत्र खेडेकर यांची प्रशंसा होत आहे.

## आरसीएफ स्कूलची सानिका इकर ९८ टक्के गुणांनी उत्तीर्ण

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्याच्या कुरूळ येथील आरसीएफ स्कूलमधील विद्यार्थिनी सानिका संजेश इकर ही दहावीच्या परीक्षेत ९८ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली. या यशाबद्दलने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत अलिबागच्या कुरुळ शाळेतील विद्यार्थिनी सानिका संजेश इकर हिने सायन्सच्या प्रत्येक विषयात ९६ ते ९७ असे गुणप्राप्त केले असून संस्कृत मध्ये १००पैकी १०० गुण प्राप्त केले आहे.

या सर्व विषयांचे गुण पाहता तिला ९८ टक्के गुण प्राप्त होऊन तिने पहिला नंबर मिळविला आहे.

पहिल्यापासूनच हुशार असणारी सानिका इकर हिने दहावी परीक्षेत चांगले गुण मिळवले असल्याने शाळेच्या वतीने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या यशाबद्दल तिने शाळेतील शिक्षकवर्ग तसेच आई- वडील यांच्याकडून लाखमोलाचे मार्गदर्शन मिळाले असल्याचे सांगितले आहे. पुढे जाऊन खूप शिकण्याची सानिकाची इच्छा असल्याचे तिने सांगितले.






मुंबई : वानखेडे स्टेडियमवर क्रिकेटपटू रोहित शर्माचे नाव स्टँडला देण्यात आले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com